दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ बुधवार, दि. २३ जुलै २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक २५३ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा

मुंबई : भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्राकडून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या किनारपट्टीला २३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० पासून ते २४ जुलै २०२५ रात्री ८.३० पर्यंत ३.६ ते ४.३ मीटर तसेच पालघर आणि रायगड जिल्ह्यांच्या किनारपट्टीला २४ जुलै २०२५ रोजीचे रात्री ८.३० पर्यंत ३.४ ते ३.८ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह सातारा घाट, कोल्हापूर घाट भागात ऑरेंज अलर्ट रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये तसेच सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात पुढील २४ तासासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असल्याने जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांनाही आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात ११७.८ मी.मी. पाऊस झाला. या पावसामुळे मौजे हदगाव नखाते, येथील सात ते आठ नागरिक पुराच्या पाण्यात घराच्या छतावर अडकले असता आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाने त्यांना सुखरूप बाहेर काढले आहे. तसेच बाधित नागरिकांना सुखरूप स्थळी हलविण्यात आले असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

गडचिरोली देशातील सर्वाधिक हरित जिल्हा बनविण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संकल्प

एक कोटी वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ; 'कोट्यधीश' वृक्षसंख्येचा मान मिळवणारा गडचिरोली हा देशातील पहिला जिल्हा ठरणार

वृत्तसंस्था ■ गडचिरोली



गडचिरोलीः राज्यात सर्वाधिक वनाच्छादित अशा गडचिरोली जिल्ह्याची ओळख 'महाराष्ट्राचे फुफ्फुस' म्हणून आहेच, परंतु आता हा जिल्हा देशातील सर्वाधिक हरित व वनाच्छादित जिल्हा बनविण्याचा संकल्प मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानांतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील एक कोटी वृक्ष लागवडीचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. यावेळी सहपालकमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, वन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव मिलिंद म्हैसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, आमदार रामदास मसराम, जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. निलोत्पल, मुख्य वनसंरक्षक रमेश कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, उपवनसंरक्षक श्रीमती आर्या आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०१४ ते २०१९ या काळात राज्यात ५० कोटी वृक्ष लागवड मोहीम यशस्वी झाली होती, ज्याचा सकारात्मक परिणाम केंद्र सरकारच्या अहवालात नमूद आहे. याच अनुभवाच्या जोरावर आता ११ कोटी वृक्ष लागवडीपासून पुढे २५ कोटी वृक्ष लागवडीपर्यंतचा टप्पा राज्य सरकारने निश्चित केला असून, त्या दिशेने पावले टाकली जात आहेत. महाराष्ट्राचे वनसंतुलन गडचिरोलीमुळेच राखले गेल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

गडचिरोलीच्या या जल, जंगल, जमीन समृद्ध नैसर्गिक संपदेचे संतुलन राखून औद्योगिक आणि पर्यावरणपूरक विकास साधायचा असल्याचा पुनरुच्चार करत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, यावर्षी गडचिरोलीत ४० लाख आणि पुढील वर्षी ६० लाख झाडे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे 'कोट्यधीश' वृक्षसंख्येचा मान मिळवणारा गडचिरोली हा देशातील पहिला जिल्हा ठरणार आहे. नियमित वृक्षारोपणासाठी येथेच नर्सरीदेखील विकसित करण्यात येत आहे. यासोबतच येथील लॉईड्स व जेएसडब्ल्यु या दोन उद्योगांना प्रत्येकी २५ -२५ लाख वृक्षरोपणाचे स्वतंत्र उद्दिष्ट देवून हरित गडचिरोलीत सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

वृक्ष लागवडीनंतर त्यांचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे असल्याने या रोपांची पुढील एक वर्ष तंत्रज्ञानाच्या साहाय्याने देखरेख केली जाणार आहे. तसेच, वनाच्छादनवाढीचा मासिक, सहामाही आणि वार्षिक अहवाल घेण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अतिदुर्गम भागातील जिमलगट्टा आणि देचलीपेठा या पोलीस ठाण्यांच्या नवीन प्रशासकीय इमारतींचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. यावेळी नक्षलग्रस्त भागातील पोलिस शहीदांच्या २३ पाल्यांना पोलिस दलात सामावून घेण्यात आले, त्यापैकी पंकज मेश्राम व मीना हेडो यांना प्रतिकात्मक स्वरूपात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री यांच्याकडे सुपूर्द केला. कार्यक्रमास महसूल, वन, कृषी विभाग तसेच अन्य संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंत्रालयात रक्तदान शिबिर; ८० रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित रक्तदान शिबिरात ८० रक्तदात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद, सर जे. जे. महानगर रक्त केंद्र व हरिवंश राय बच्चन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात राज्य माजी आमदार समन्वय समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार रामभाऊ गुंडीले, फिरोज मासुकदार, राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सहाय्यक संचालक डॉ. पुरुषोत्तम पुरी, तसेच प्रतिष्ठानचे संस्थापक निवृत्ती यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी सर जे. जे. महानगर रक्त केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. चित्रा आचार्य, सर जे जे रुग्णालय व महाविद्यालयाच्या वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती नीता डांगे, तसेच प्रतिष्ठानचे हरीश रावल आदींनी सहभाग घेतला.

सकाळी ९ वाजता सुरू झालेल्या या रक्तदान शिबिरास सायंकाळी ५ वाजेपर्यंत लोकप्रतिनिधी, शासकीय व पोलीस अधिकारी, कर्मचारी, व नागरिकांनी भेट दिली. यावेळी रक्तदानाबाबत विविध माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

राज्यात विक्रमी १०२ रोजगार मेळावे, ५७ हजार नोंदणी, २७ हजार युवकांना एकाच दिवशी रोजगार

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांची अभिनव संकल्पना

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाने आयोजित केलेल्या राज्यव्यापी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात विक्रमी ५७ हजार तरुणांनी नोंदणी केली तर २७ हजार तरुणांना एकच दिवशी रोजगार मिळाला आहे. राज्यातल्या तरुणांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस अविस्मरणीय ठरावा, त्यांच्या करिअर मध्ये नवा अध्याय सुरु व्हावा, या उद्देशाने कौशल्य, रोजगार व उद्योजकता व नाविन्यता विभागाने हा अभिनव उपक्रम राबवला असल्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट केले.

मुंबईतील गावदेवी इथल्या शारदा मंदिर हायस्कूलमध्ये आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्यात ते बोलत होते. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर व शारदा मंदिर हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला असून राज्यात असे शंभर मेळावे आयोजित करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

विकासाची दूरदृष्टी असलेले आणि महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखरावर पोहचवणारे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तरुणांच्या रोजगारावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. त्या अनुषंगाने हा उपक्रम राबवला आहे. या मेळाव्यातून राज्यातल्या हजारो तरुणांचे स्वप्न साकार होत असून उज्जवल भविष्याकडे त्यांची वाटचाल सुरू झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनात यापुढेही असे उपक्रम सुरूच राहतील असा विश्वास मंत्री श्री. लोढा यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रात विविध ठिकाणी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यातून हजारो तरुणांना खासगी तसेच शासकीय महामंडळात काम करण्याची संधी उपलब्ध होत आहे. औद्योगिक, माहिती तंत्रज्ञान, विमा, लॉजीस्टिक, व्यवस्थापन आणि सेवा क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध होत आहेत. मुंबईतील गावदेवी इथल्या शारदा मंदिर हायस्कूल मध्ये आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात एकूण २५ आस्थापनांनी सहभाग घेतला यात पाच शासकीय महामंडळाचाही सहभाग होता. तसेच पाचशे युवक युवतींनी या मेळाव्यात नोंदणी केली. रोजगार मिळवून देणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश असला तरी, तरुणांना शासकीय योजनांची माहिती तसेच स्वयं रोजगाराबाबत समुपदेशन ही कौशल्य विभागा मार्फत सुरू असल्याची माहिती कौशल्य विभागाचे सहायक आयुक्त शैलेश भगत यांनी यावेळी दिली. कौशल्य विकास मार्गदर्शन अधिकारी विद्या शिंगे आणि मुकेश संखेही यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते 'बहिणाबाई मार्ट'चे उद्घाटन

शहराच्या मध्यवर्ती भागात बचत गटांना मिळणार बारमाही विक्री व खाऊ गल्लीचा आधार

वृत्तसंस्था ■ जळगाव



जळगाव : जळगाव शहरातील राजकमल टॉकीजजवळ जिल्हा परिषद बचत भवन इमारतीत 'बहिणाबाई मार्ट' या विशेष प्रकल्पाचे आज जल्लोषात उद्घाटन करण्यात आले. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते हा लोकोपयोगी प्रकल्प आज जनतेच्या सेवेत दाखल झाला.

या प्रकल्पाअंतर्गत जळगावातील नागरिकांना आता वर्षभर महिला बचत गटांनी बनवलेली उत्पादने खरेदी करता येणार असून, त्याचबरोबर पारंपरिक चविष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याचीही संधी मिळणार आहे. 'महिला बचत गटांच्या आर्थिक स्वावलंबनाचे हे नवे पर्व आहे. बहिणाबाई मार्ट आणि खाऊ गल्लीच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना बारमाही उत्पन्नाचा स्रोत मिळेल आणि त्यांच्या कलेला हक्काचे व्यासपीठ मिळेल,' असे उद्गार पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी यावेळी काढले. लवकरच या मार्टमध्ये 'खाऊ गल्ली' कार्यान्वित होणार असल्याची माहितीही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सूर्यवंशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजू लोखंडे, तसेच माजी महापौर विष्णू भंगाळे उपस्थित होते.

जिल्ह्यात सध्या ३१ हजार महिला बचत गट कार्यरत असून, त्यांचे ६७ प्रभाग संघ आहेत. सरस प्रदर्शनाच्या माध्यमातून आजवर गटांच्या उत्पादनांची विक्री होत होती. मात्र, त्याला बारमाही आणि स्थायी बाजारपेठ मिळावी या हेतूने पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या संकल्पनेतून 'बहिणाबाई मार्केट' उपक्रमाचा प्रारंभ झाला. या व्यतिरिक्त जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्ह्यात विविध ठिकाणी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, जिल्हाभरात १० ठिकाणी बहिणाबाई मार्केटसाठी भूमिपूजन पार पडले आहे. यासाठी अनेक ठिकाणी कामास सुरुवातही झाली असून, काही ठिकाणी लवकरच हे मार्केट सुरू होणार आहे.

जळगाव शहराच्या मध्यभागी असलेल्या कोंबडी मार्केट इमारतीतील २० गाळ्यांमध्ये हे बहिणाबाई मार्ट कार्यरत करण्यात आले आहे. हे गाळे प्रभाग संघ निहाय अदलाबदल करून वापरण्याची सुविधा असून, नाममात्र भाडे आकारले जाणार आहे.

लवकरच 'खाऊ गल्ली', खवय्याच्या सेवेत

सरस प्रदर्शनांमध्ये खाण्याच्या स्टॉलवर सर्वाधिक गर्दी पाहायला मिळते. सुगरणींच्या हातच्या पारंपरिक चविष्ट पदार्थांना मागणी असते. हे लक्षात घेऊन पालकमंत्र्यांनी इमारतीतील अंतर्गत गाळ्यांमध्ये खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या बचत गटांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने येत्या १५ दिवसांत खवय्यांसाठी खास 'खाऊ गल्ली' सुरु होणार आहे. हे बहिणाबाई मार्ट महिला बचत गटांच्या आर्थिक स्वावलंबनाचे नवे मापदंड निर्माण करेल, असा विश्वास पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

माजी विधानपरिषद सभापती दिवंगत शिवाजीराव देशमुख यांच्या स्मारकाचा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला आढावा

वृत्तसंस्था ■ सांगली



सांगली : माजी विधानपरिषद सभापती दिवंगत शिवाजीराव देशमुख यांचे स्मारक बांधण्याकरिता राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीमध्ये आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या या बैठकीस आमदार सत्यजीत देशमुख, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, सांगली महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता के. डी. मुधाळे, पालकमंत्री यांचे विशेष कार्यअधिकारी बाळासाहेब यादव, शिराळा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सुरज कांबळे, सार्वजनिक बांधकाम उपविभाग शिराळाचे उपविभागीय अधिकारी प्रमोद चौगुले आदि उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शिराळा तालुक्यातील मौजे कोकरुड व मौजे चिंचोली येथील जलसंपदा विभागाची एकूण ४.६७ हेक्टर आर इतकी जागा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याची सूचना केली.

तसेच स्मारकाच्या कामामध्ये प्रशासकीय कार्यालय, फोटो गॅलरी, मंडप, पुतळ्यासाठीचा चबुतरा, वागबगिचा, उपहारगृह, कॉन्फरन्स हॉल, बैठक व्यवस्था, खुले सभागृह ओपन जीम, अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी विश्रामगृह, वेध शाळा, पार्किंग एरिया, स्वच्छतागृह व चौकीदार कक्ष इत्यादी बाबींची तरतूद करुन प्रस्तावासंदर्भात लवकरात लवकर पुढील कार्यवाही करण्याच्या या बैठकीमध्ये देण्यात आल्या.

वर्ल्डवन एनर्जी कंपनीच्या माध्यमातून ऊर्जा क्षेत्रात उत्तम परिसंस्था निर्माण होईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

उमरेड येथे सौर व हरित हायड्रोजन ऊर्जा प्रकल्पांचे उद्घाटन

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : वर्ल्डवन एनर्जी कंपनीने प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करून सौर ऊर्जा आणि हरित हायड्रोजन ऊर्जा निर्मिती क्षेत्रात चांगली सुरुवात केली असून येत्या काळात उमरेड परिसरात सौर व हरित ऊर्जेची उत्तम परिसंस्था निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

उमरेड येथील एमआयडीसी परिसरात स्थित वर्ल्डवन एनर्जी प्रा. लि. च्या १.२ गिगा वॉट क्षमता सौरऊर्जा उत्पादन सुविधेचे उद्घाटन आणि २.५ मेगा वॉट क्षमतेच्या हरित हायड्रोजन ऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. वित्त व नियोजन राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, आमदार डॉ. संजय मेश्राम आणि डॉ. आशिष देशमुख, माजी आमदार सुधीर पारवे आणि राजू पारवे, वर्ल्डवन एनर्जिजचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक मुर्तजा कोठावाला उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वर्ल्डवन एनर्जी कंपनीने उमरेडमध्ये उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पात प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून अधिकची २५ टक्के ऊर्जा निर्मिती होणार आहे. यासोबतच हरित हायड्रोजन ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातूनही पर्यावरण अनुकूल ऊर्जा निर्मिती होणार आहे. या दोन्ही प्रकल्पातून उमरेड परिसरात एक उत्तम परिसंस्था तयार होणार असून या भागाच्या विकासासाठी हा महत्वाचा प्रकल्प ठरणार आहे.

वर्ल्डवन एनर्जिजचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक मुर्तजा कोठावाला यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या प्रकल्पाची पाहणी केली व सविस्तर माहिती घेतली.

यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी २५ लाखांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पुसद तालुक्यात ६५ शाळांमध्ये वृक्षारोपण

वृक्षसंवर्धनाची आगळीवेगळी भेट; राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची उपस्थिती

वृत्तसंस्था ■ यवतमाळ

यवतमाळ : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त पुसद तालुक्यातील ६५ जिल्हा परिषद शाळांमध्ये वृक्षारोपण करण्याचा नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. या अंतर्गत शाळांमध्ये वड, पिंपळ, लिंब, करंज यांसारख्या निसर्गोपयोगी वृक्षांची लागवड करत पर्यावरण संवर्धनाचा महत्वपूर्ण संदेश देण्यात आला.

या नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत राज्याचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्र शिक्षण, पर्यटन, आदिवासी विकास, मृदा व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी स्वतः पुढाकार घेत पुसद तालुक्यातील ६५ पैकी २ शाळांमध्ये वृक्षारोपण केले. त्यात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वनवारला आणि जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव या शाळांचा समावेश आहे. त्यांनी या निमित्ताने विद्यार्थ्यांशी संवाद साधत निसर्गाच्या समतोलाविषयी जागरूकता निर्माण केली.

'वाढदिवस साजरा करण्याची ही एक प्रेरणादायक पद्धत आहे. प्रत्येकाने यावर्षी किमान एक तरी वृक्ष लावून तो जगवावा,' असे आवाहन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी उपस्थितांना केले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुक्यातील उर्वरित ६३ शाळांमध्येही मोठ्या उत्साहात वृक्षारोपणाचे कार्यक्रम पार पडले. पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ आणि विद्यार्थी यांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला.

राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या संकल्पनेतून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्या घेण्यात आलेल्या वृक्षारोपणाच्या या अभिनव उपक्रमामुळे पुसद तालुक्यात पर्यावरण संरक्षणाबाबत सकारात्मक संदेश गेला असून, 'झाड लावा - झाड जगवा' या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचा आदर्श या माध्यमातून घालून दिला गेला आहे. या उपक्रमाचे यश सुनिश्चित करण्यासाठी पंचायत समिती पुसदचे गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी सर्व बीएआरसी कर्मचारी सर्व केंद्रप्रमुख आणि ६५ शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.


संपादकीय...

मुलगी जाते जिवानिशी...

ही दोन्ही प्रकरणे आजच्या मुलींच्या महत्त्वाकांक्षा समजून न घेता आपला पुरुषप्रधान अहंकार कुरवाळत बसणाऱ्या वृत्तीचे प्रतिनिधित्व करतात.ओडिशा आणि हरियाणा या दोन राज्यांमध्ये गेल्या १५ दिवसांमध्ये दोन तरुण मुलींच्या बाबतीत घडलेल्या घटना कमालीच्या अस्वस्थ करणाऱ्या आहेत. ओडिशामधील घटनेत बीएड् करणाऱ्या - त्या अभागी मुलीचा विभागप्रमुखाकडून सतत छळ होत होता. त्याच्याकडून होणाऱ्या लैंगिक मागण्यांना कंटाळून तिने महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे तक्रारही केली होती. तक्रारीची दखल घेतली गेली नाही तर प्राचार्यांच्या केबिनसमोर आपण जीव देऊ असेही तिने लेखी दिले होते. तिच्या तक्रारीची दखल तर घेतली गेली नाहीच, उलट विभागप्रमुख आणि प्राचार्यांनी संगनमताने तिच्या पाठीशी इतर कोणी उभे राहणार नाहीत,अशीही व्यवस्था केली. आपल्या तक्रारीचा काहीच उपयोग होत नाही, या उद्विग्नतेतून तिने स्वतःवर पेट्रोल ओतून घेऊन जाळून घेतले.आत्महत्या हा काही कोणत्याही प्रश्नावर उपाय नाही वगैरे तत्त्वज्ञान यावर झाडले जाईलच, पण एखाद्या मुलीच्या गंभीर तक्रारीची दखलच न घेणे आणि संबंधितांना वाचवणे हा देखील मार्ग नव्हे. - एखाद्या जिवावर स्वतःवर पेट्रोल ओतून घेऊन जाळून घ्यावे एवढी वेळ येत असेल, तर त्याची त्या काळात किती तगमग झाली असेल या विचारानेच कुणाही संवेदनशील माणसाच्या अंगावर काटा येईल. लैंगिक छळाची तक्रार करायला आधीच एखादी स्त्री स्वतःहून पुढे येणे किती कठीण असते ते वेगळे सांगायला नको. अशा वेळी तिच्या बाजूने ठामपणे उभे राहण्याऐवजी तिलाच आत्महत्या करायला भाग पाडणारी आपली व्यवस्था किती कोडगी आहे, ते दिसते. विशाखा समितीची तरतूद, स्त्रियांच्या बाजूने कायदे असे सगळे असतानाही असे घडते हे आणखी चीड आणणारे. कारण कायदा आपल्यासाठी नाही, आपल्या बाजूने नाही हा यातून जाणारा संदेश तर अशा घटनांना तोंड देणाऱ्या इतर स्त्रियांना आणखी नाउमेद करणारा आहे.घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांना कसे वागवले जाते ते पाहा, असे म्हणावे तर दुसऱ्या एका घटनेत ओडिशाहून जवळपास १७०० किलोमीटर अंतरावर असलेल्या हरियाणामध्ये वडीलच मुलीचा खून करतात. वडिलांच्याच प्रोत्साहनाने टेनिस या खेळात कारकीर्द घडवलेल्या, टेनिस अकादमी चालवणाऱ्या, गाण्याच्या अल्बममध्ये सहभाग घेणाऱ्या राधिका यादव या गुणी मुलीची कहाणी दुर्दैवी ठरली. ती स्वयंपाकघरात काम करत असताना तिच्यावर तिच्या वडिलांनीच पाठीमागून एक नाही, दोन नाही, तर तब्बल पाच गोळ्या झाडल्या. बापलेकीच्या नात्यातील जिव्हाळा बंदुकीच्या गोळ्यांनी संपवण्याइतके क्रौर्य त्या बापात का निर्माण झाले असावे, याचे प्रथमदर्शनी मिळणारे उत्तर थेट मध्ययुगात नेणारे आणि तरीही आजच्या काळातील पुरुषप्रधान मानसिकतेची परिसीमा दाखवणारे आहे. राधिका यादवला तिच्या वडिलांनीच टेनिस खेळायला प्रोत्साहन दिले. तिचे सामने असत तेव्हा आईवडिलांपैकी कोणी तरी सतत तिच्याबरोबर असे. तिच्या वडिलांनीच तिला टेनिस अकादमी सुरू करायला मदत केली. त्यासाठी दोनेक कोटी रुपये खर्च केले असेही वृत्त आहे. भाडेतत्त्वावर दिलेल्या घरांमधून तिच्या वडिलांना चांगले उत्पन्न येत असे. तरीही 'मुलगी कमावते आणि तिच्या पैशांवर तू जगतोस' अशी शेरेबाजी गावात कुणी तरी केल्यावर या दीपक यादव नावाच्या इसमाचा अहंकार दुखावला आणि त्याने 'टेनिस अकादमी बंद करून टाक' असा लकडा मुलीमागे लावला. या गोष्टीला राधिका तयार नव्हती आणि त्यामुळे तिच्या वडिलांनी तिचा गोळ्या घालून खून केला असे म्हटले जात आहे. राधिकाचा मोकळा वावर, ती करत असलेले रील्स यावरही तिच्या वडिलांचा आक्षेप होता आणि त्या सगळ्या रागातून त्यांनी हे अत्यंत हिंस्र पाऊल उचलले असे सांगितले जात आहे.ओडिशा असो की हरियाणा, घर असो की दार, सगळीकडे पुरुषांची मानसिकता एकाच प्रकारची का आहे? आपल्याच प्रोत्साहनाने आपली लेक काही तरी करू पाहत असेल तर तिच्याभोवती आपल्या भक्कम आधाराचे संरक्षक कवच उभारावे असे या बापाला का वाटले नसेल? 'तुम्हीही तुमच्या मुलीला असेच उभे करा', असे टीकाकारांना ठामपणे का सांगता आले नसेल? लोक दोन्ही बाजूंनी बोलतात, तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष करणेच बरे असे का वाटले नसेल? आपली मुलगी, बहीण, बायको यांनी आर्थिकदृष्ट्या आपापल्या पायांवर ठाम उभे असलेच पाहिजे, वेळ पडली तर आपल्याशिवायही त्यांना नीट जगता आले पाहिजे, असे अशा पुरुषांना का वाटत नाही? महत्त्वाकांक्षेचे पंख लेऊन आपल्या घरातली कोणीही स्त्री उडू पाहत असेल तर त्या पंखांना बळ द्यायचे, भक्कमपणे पाठीशी उभे राहायचे की ते पंखच छाटून टाकायचे? कुणी तरी उठून टीका करते तर त्या टीका करणाऱ्याला त्याची जागा दाखवायची की आपल्याच लेकीचा जीव घ्यायचा? मुळात बायको, मुलगी, बहीण यांच्या कमाईवर एखाद्या पुरुषाला कधी तरी जगावे लागले तर ते त्याला किंवा इतरांना इतके टोचावे ते का? खरे तर ते टोचणे सोयीनुसारच असते. बायकोच्या कमाईवर बिनदिक्कतपणे हक्क सांगत, उलट तिलाच न्यूनगंड देणाऱ्या पुरुषांची समाजात कमतरता नाही. पण इथे आपल्याकडे पैसा असतानाही आपल्याला 'मुलीच्या पैशावर जगतोस' असे हिणवले जाते, हा राग. म्हणजे पुन्हा अहंकाराला धक्काच. आदर्श राजा ठरण्याच्या नादात कुणाच्या तरी टीकेमुळे आपल्या गर्भवती पत्नीचा 'त्याग' करण्याच्या वृत्तीपेक्षा तो फारसा वेगळा नाही. काहीही झाले की त्याला धार्मिक वळण द्यायचे हा आपल्याकडचा अलीकडच्या काळातला आवडता छंद. राधिका यादवने इनाम उल हक या गायकाच्या 'कारवाँ' या अल्बममध्ये सहभाग घेतला होता. तसा एक व्हिडीओही तिच्या इन्स्टाग्राम खात्यावर आहे. या सुतावरून स्वर्ग गाठत हे 'लव्ह जिहाद'चे प्रकरण असल्याचाही दावा केला. पण दीपक यादवची कबुली आणि राधिका यादवच्या मित्रमंडळींची विधाने यामुळे तो वेळीच फेटाळून लावला गेला.ओडिशामधली जळीत मुलगी असो की राधिका यादव, ही दोन्ही प्रकरणे आजच्या मुलींच्या महत्त्वाकांक्षा समजून न घेता आपला पुरुषप्रधान अहंकार कुरवाळत बसणाऱ्या वृत्तीचे प्रतिनिधित्व करतात. एका प्रकरणात शैक्षणिक महत्त्वाकांक्षा बाळगणारी मुलगी लैंगिक मागण्यांना नकार देते म्हणून तिला आत्महत्येच्या पायरीपर्यंत जाणे भाग पाडले जाते तर दुसऱ्या प्रकरणात करिअर करू पाहणारी मुलगी बापाच्या प्रतिष्ठेआड येते म्हणून जिवानिशी संपवली जाते. म्हणजे इच्छा, आकांक्षा, भावना, अहंकार हे सगळे आहे ते फक्त पुरुषांनाच. त्याला धक्का लावणारी स्त्री ओडिशामध्ये असो, हरियाणामध्ये असो, पश्चिम बंगालमध्ये असो की कर्नाटकात असो... देशाच्या कोणत्याही भागात तिच्या वाट्याला हेच प्राक्तन येते. पुरुषांनी कसे मर्द असले पाहिजे, पुरुषासारखे वागले पाहिजे, घरातल्या बाईच्या तालावर नाचता कामा नये, प्रत्येक बाबतीत स्त्रीपेक्षा वरचढच असले पाहिजे हे त्याला अगदी लहानपणापासून जे 'बाळकडू' दिले जाते, ते हळूहळू स्त्रीपुरुष संबंधांमधले कडू जहर बनून जाते. या वातावरणात वाढणारे पुरुष स्त्रीचा माणूस म्हणून कधीच विचार करू शकत नाहीत. त्यांना त्यांच्या आसपास हवी असते ती त्यांच्या अंकित बनून राहायला तयार असणारी स्त्री. तशी ती असेलच असे नाही, म्हणून मग ती नकोच. तिने करिअर, नोकरी, व्यवसाय काहीही करायचे की नाही हा निर्णय तिचा नसतो. लग्न केले तर मूल व्हावे की नाही, हा निर्णय तिचा नसतो. हुंड्यासाठी तिला कधी मारून टाकले जाईल याचा नेम नसतो. गृहिणी म्हणून ती वावरत असेल तर तिच्या घरकामाला काडीची किमत नसते. एकूण काय, तर तिने महत्त्वाकांक्षी असण्यापेक्षा जिवानिशी गेलेले बरे.

संघर्षाच्या मार्गावर हिंसा ही मोठी गोष्ट नाही

२३ जुलैः क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद जयंती विशेष...



आपल्या मातृभूमीची दुर्दशा पाहून जर तुमचे रक्त सळसळत नसेल तर ते रक्त नव्हे, पाणी आहेष्ठ अगदी बालवयातच चंद्रशेखर आझाद यांच्यात देशभक्तीची भावना ओतप्रोत भरलेली होती. भारताच्या स्वातंत्र्यात त्यांचे अमुल्य योगदान आहे. क्रांतिकारकांचे स्मरण जेंव्हाही केले जाते तेंव्हा सर्वप्रथम चंद्रशेखर आझाद यांचे स्मरण होते. शक्तिशाली व्यक्तीमत्वांचा विचार मनात येताच सर्वप्रथम आपल्या डोळ्यांसमोर येते चंद्रशेखरजी आझाद यांचे व्यक्तिमत्व. रोचक माहिती वाचा, श्री कृ. गो. निकोडे-कृगोनि यांच्या शब्दशैलीत... संपादक.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

चंद्रशेखरजी एक महान युवा क्रांतिकारी, ज्यांनी भारताच्या रक्षणाकरीता आपल्या प्राणांची आहुती दिली. आझाद आपल्या देशाचे वीर सुपुत्र होते, आपल्या पराक्रमाची आणि शौर्याची गाथा त्यांनी स्वतः लिहिली आहे.

'आओ झुक कर सलाम करे उनको,
जिनके हिस्से में ये मुकाम आता है!
खुशनसीब होते है वो लोग,
जिनका लहू इस देश के काम आता है!!'

चंद्रशेखर आझाद यांचा जन्म दि.२३ जुलै १९०६ रोजी मध्यप्रदेशातील भाभरा गावी झाला. चंद्रशेखर सिताराम तिवारी असे त्यांचे मूळ नाव होते. त्यांचे वडील अत्यंत प्रामाणिक, स्वाभिमानी आणि दयाळू वृत्तीचे होते. दुष्काळ पडल्याने आपले बदरका हे मूळ गाव सोडून आपल्या कुटुंबासह ते भाभरा या गावी स्थायिक झाले. भिल्ल वस्तीत त्यांचे बालपण गेल्याने त्या मुलांसारखे त्यांना देखील धनुष्यबाण उत्तम रीतीने चालवता येऊ लागले. बालपणापासून विद्रोही स्वभावामुळे त्यांचे मन काही अभ्यासात रमले नाही. खेळणे मात्र त्यांना फार आवडे. त्यांना आणि त्यांचा भाऊ सुखदेवला शिकविण्यासाठी त्यांच्या वडिलांचे मित्र मनोहरलाल त्रिवेदी घरी येत असत. त्यांच्या आईला त्यांना संस्कृतचा विद्वान बनविण्याची इच्छा होती, त्यामुळे त्यांना संस्कृत शिकण्यासाठी वाराणसी येथील काशी विद्यापीठात पाठविण्यात आले.

महात्मा गांधीजींच्या असहकार आंदोलनात आझाद यांचा खुप मोठा सहभाग राहिला होता. गांधीजींनी सन १९२१ साली असहकार आंदोलनाची घोषणा केली. त्यावेळी चंद्रशेखरजी केवळ पंधरा वर्षांचे होते. अगदी तेंव्हापासून त्यांच्यात देशभक्तीची भावना उचंबळत असल्याने ते गांधीजींच्या असहकार आंदोलनात सहभागी झाले. परिणामी त्यांना कैद करण्यात आले. न्यायालयात न्यायाधीशांनी नाव विचारल्यावर त्यांनी आझाद असे सांगितले, वडीलांचे नाव स्वतंत्र आणि निवासस्थान तुरुंग सांगितले होते. आझादच्या उत्तराने न्यायाधीश संतापले आणि त्यांनी पंधरा फटक्यांची शिक्षा सुनावली. आपल्या निश्चयावर ठाम राहणाऱ्या आझादने शिक्षा सहन केली. प्रत्येक फटक्यानिशी भारत माता की जय! असा नारा दिला. या घटनेनंतर चंद्रशेखर तिवारी हे आझाद नावाने प्रसिद्ध झाले. त्यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील कार्यकर्तृत्वाचा महत्वपूर्ण उल्लेख इतिहासात आढळतो. सन १९२२ साली गांधीजींनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना फार वाईट वाटले. त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वतंत्र करण्याची शपथ घेतली. पुढे त्यांची भेट हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली. ही एक क्रांतिकारी संस्था होती, यात सर्वांचा अधिकार समान होता आणि कुणाशीही भेदभाव केला जात नव्हता. या गोष्टीमुळे आझाद फार प्रभावित झाले. त्यांच्या नेतृत्वात या संस्थेनी इंग्रजांच्या तिजोऱ्या लुटून संस्थेकरीता निधी गोळा केला. सन १९२५ साली त्यांनी तडीस नेलेल्या काकोरी कांडाची इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद झाली आहे. संस्थेच्या एकूण दहा सदस्यांनी इंग्रजांचा खजिना जात असलेल्या काकोरी ट्रेनला लुटून इंग्रजांपुढे तगडे आव्हान उभे केले होते. काकोरी प्रकरणात चंद्रशेखर आझाद यांचा महत्वपूर्ण वाटा आहे. याशिवाय महान क्रांतिकारी रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्ला खां, राजेंद्र नाथ लाहिडी तथा ठाकूर रोशन सिंह यांना या प्रकरणात फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती.

चंद्रशेखर आझाद यांच्यापुढे पुन्हा नव्याने संस्थेला उभारी देण्याचे आव्हान उभे राहिले. ओजस्वी, विद्रोही आणि तापट स्वभावाचे चंद्रशेखर आझाद इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन दिल्लीला निघून गेले. त्याठिकाणी त्यांनी क्रांतीकारकांची एक सभा आयोजित केली. तेथे त्यांची भेट भगतसिंग यांच्याशी झाली. हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनने पुन्हा एकदा क्रांतिकारी आणि गुन्हेगारी मार्गांचा अवलंब केल्याने इंग्रज चंद्रशेखर आझाद यांच्या मागावर होते. आझाद यांनी लाला लजपत राय यांच्या हत्येचा सूड घेण्यासाठी सन १९२८ साली सॉन्डर्सची हत्या केली. चंद्रशेखर आझाद म्हणायचे, की संघर्षाच्या मार्गावर हिंसा ही मोठी गोष्ट नाही! पुढे इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली. भगत सिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडवण्यासाठी देखील आझाद यांनी खुप प्रयत्न केलेत, परंतु इंग्रजांच्या सैन्य बलापुढे त्यांचा नाईलाज झाला. नेहमीप्रमाणे इंग्रजांना चकमा देण्यात ते यावेळीही यशस्वी ठरले. चंद्रशेखरजी म्हणायचे, की ते आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत देशासाठी शत्रूशी लढत राहतील. मरेपर्यंत इंग्रजांच्या हाती न लागण्याची त्यांनी शपथ घेतली होती, ती त्यांनी पाळली. ते आपल्या नावाप्रमाणे शेवटपर्यंत आझाद राहिले आणि देशाकरता प्राणाची आहुती दिली. चंद्रशेखरजी आझाद हे एक महान क्रांतिकारी होते. आपल्यातील देशभक्तीची भावना व अद्वितीय साहसाने त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. त्यांनी अनेक लोकांना या आंदोलनात सहभागी होण्याकरता प्रेरित केले. मातृभूमीच्या या महान सुपुत्राने आपल्यातील शौर्याच्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि वाइसरायच्या ट्रेनला उडवण्याचा देखील प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर महान क्रांतिकारी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी सॉन्डर्स या इंग्रज अधिकाऱ्यावर गोळ्या झाडल्या. शिवाय भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्यासमवेत हिंदुस्तान समाजवादी प्रजातंत्र सभेची स्थापना केली. चंद्रशेखर आझाद हे भगतसिंगचे सल्लागार होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली.

इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली होती. दुसरीकडे चंद्रशेखर आझाद ही शिक्षा कमी करून जन्मठेप व्हावी, यासाठी खुप प्रयत्न करत ते अलाहाबादला आले होते. परंतु याचा सुगावा इंग्रजांना लागल्याने त्यांनी अल्फ्रेड पार्कमध्ये चारी बाजूंनी त्यांना घेरले. दोन्ही बाजूंनी चकमक आणि गोळीबार सुरु झाला, एक क्षण असा आला की आझादांच्या बंदुकीत केवळ एक गोळी उरली होती. त्यांना परिस्थितीचा अंदाज आला होता, त्यामुळे इंग्रजांच्या हातून मरण्यापेक्षा त्यांनी स्वतःवर गोळी झाडणे पसंत केले. अशा प्रकारे दि.२७ फेब्रुवारी १९३१ रोजी भारतमातेचा वीर सुपुत्र अमर झाला आणि त्यांची अमरगाथा इतिहासाच्या पानांमध्ये सुवर्णाक्षरांनी कोरल्या गेली.

!! जयंती निमित्त या महान क्रांतीकारकाला दंडवत प्रणाम !!

फंड...

दिवसा रात्री मेहनत
गोळा करे पार्टी फंड
सेवाभाव जाणे खरा
भले कुणी बोले गुंड

भरत रहावी तिजोरी
सतत आम्हांला कंड
हाताळे प्रकार सगळे
धडपड चाले अखंड

गळा लागतो दाबाया
आवळे वेळीदोरखंड
पाळण्यात दिसे पाय
सुरवातीपासून रे बंड

कामाचे वेळी अडवा
दाब दबाव ते बलदंड
विरोध करणारे कोण
थोपटून राहतोयं दंड

जराशी पाऊलेचुकता
रे वसूल करायचा दंड
काळीमा माझ्या नावे
घालतात वाद वितंड

नाक दाबूनि धरायचे
आपोआप उघडे तोंड
राजरोस विकावे बॉंड
विवादाला फोडा तोंड

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

यत्नसिध्द...

चिरकाल
टिके विजय
जेंव्हा सार्थ
यत्नसिध्द
शांतीबंधुत्वभावास्तव
हिंदुस्तान जग प्रसिद्ध

सद्भावसहिष्णू नायक
रवि दास नानक बुध्द
विश्वगुरू पताका करी
आत्मनिर्भर स्वयंसिद्ध

पराकोटीचे सहनशील
कणखर न् गंभीरजिद्द
महाकाल होई महादेव
लांघताचं परिसिमाहद्द

उघडे तृतीयनेत्र करारी
किल्ले कोसळे अभेद्य
तर्पणकरे भल्याभल्या
घालेलं दुष्मनांचे श्राध्द

तिरंगा सन्मान सर्वोच्च
जनसुरक्षा कर्तव्यआद्य
धक्क लागे अस्मितेला
रणशिंगनिर्णायक वाद्य

सर्वं धर्मसमभाव जपते
भारतमा दैवत आराध्य
हेतू असताना धारेशुध्द
साध्य करे सर्व असाध्य

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विविध क्षेत्रातील नव्या रोजगार संधींचा तरुणांनी लाभ घ्यावा : पालकमंत्री जयकुमार रावल

वृत्तसंस्था ■ धुळे



धुळे : महाराष्ट्रात औद्योगिक, कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यटन आणि डिजिटल क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. या क्षेत्रात भविष्यात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होणार असल्याने तरुणांनी या नव्या रोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे व मॉडेल करिअर सेंटर आणि शिक्षण महर्षी दादासाहेब रावल नॉलेज सिटी, दोंडाईचा यांच्या संयुक्त विद्यमाने आज शिक्षण महर्षी दादासाहेब रावल नॉलेज सिटी, दोंडाईचा येथे जिल्हास्तरीय पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे उद्घाटन पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या मेळाव्यास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे ,जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, अप्पर तहसीलदार संभाजी पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील गोसावी, जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त राजू वाकुडे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले की, राज्य सरकारच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहेत. यात मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्र उपक्रमांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहने, लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग व सप्लाय चेन व्यवस्थापन यामध्ये हजारो रोजगार निर्माण होत आहेत. कृषी आधारित उद्योगात फार्मगेट प्रोसेसिंग, शीतगृह, फळ-भाजीपाला प्रक्रिया, कृषी ड्रोन, सेंद्रिय शेती, स्मार्ट सिंचन तसेच राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, मेट्रो प्रकल्प, स्मार्ट सिटी मिशन यामुळे कुशल-अकुशल कामगारांसाठी मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. तर माहिती तंत्रज्ञान व डिजिटल क्षेत्रात ए.आय, डेटा सायन्स, ब्लॉकचेन, सायबर सिक्युरिटी, गेम डेव्हलपमेंट, डिझाईन अशा क्षेत्रात उच्च शिक्षित युवकांसाठी करिअरच्या अमर्याद संधी उपलब्ध आहेत. तसेच वर्क फ्रॉम होम आणि फ्री लाईन मुळे ग्रामीण भागातही रोजगाराचा विस्तार होत आहे.

सौर व पवन उर्जेवर आधारित प्रकल्प, ईव्ही चार्जिंग स्टेशन्स आणि ग्रीन बिल्डिंग्स यामध्ये २०२९ पर्यंत १० लाखांहून अधिक रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. हेल्थटेक, टेलिमेडिसिन, आयुष सेवा, ग्रामीण आरोग्य केंद्रे, कौशल्य विकास प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी गरज आहे. इको-टुरिझम, गड-किल्ले पर्यटन, आदिवासी भागातील पर्यटनामुळे स्थानिकांना गाईड, होम स्टे व्यवस्थापक, खाद्य सेवा यामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध असून तरुणांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. याशिवाय डिजिटल मार्केटिंग, युट्यूब, ब्लॉग सारख्या माध्यमातून डिजिटल स्वयंरोजगाराचे नवीन पर्याय तयार होत आहे.

यात योग्य तयारी केल्यास ग्रामीण भागातील युवकही यशस्वी होऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मिळेल त्या संधीचा फायदा घ्यावा, यासाठी सातत्याने प्रयत्न करावे, आपल्याला जी योग्य संधी मिळेल, ती संधी घेऊन, कष्ट करत, सातत्याने प्रयत्न केले, तर कुठलेही यश आपल्यापासून दूर राहू शकणार नाही. आपण आपले जे ध्येय आहे, आपला जो संकल्प आहे, त्या संकल्पापूर्तीसाठी आपण पुढे गेले पाहिजे त्यातून विद्यार्थ्यांना यश निश्चितच मिळेल. या रोजगाराच्या विविध संधीचा विद्यार्थ्यांनी आणि बेरोजगार युवकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. यावेळी त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्यात.

प्रास्ताविकात सहाय्यक आयुक्त राजू वाकुडे म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कौशल्य विकास विभागामार्फत संपूर्ण महाराष्ट्रात १०० रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. धुळे शहरांमध्ये दोन प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केलेले आहे. तर दोंडाईचा येथे जिल्हास्तरीय पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आजच्या रोजगार मेळाव्यामध्ये जवळजवळ २५ विविध क्षेत्रातील कंपन्यांनी सहभाग नोंदवलेला असून, या कंपन्यांच्या माध्यमातून जवळपास १ हजार पेक्षा जास्त रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. आजच्या रोजगार मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे, आजच्या रोजगार मेळाव्यामध्ये आपण कुठलीही शैक्षणिक पात्रता धारण करत असलात - दहावी पास, बारावी पास, आयटीआय, डिप्लोमा, इंजिनिअरिंग, बीएससी ?ग्री या सर्वच क्षेत्रातील विद्यार्थ्यांना आज इथे रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचाही लाभ आपण या रोजगार मेळाव्यामध्ये देणार आहोत. आता या योजनेची मुदत ११ महिन्यापर्यंत वाढविण्यात आली आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून ३२०० लाभार्थ्यांनी लाभ घेतला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्राचार्य के.डी गिरासे यांनी संस्थेविषयी माहिती दिली. मेळाव्याचे सूत्रसंचालन डी.एम. गिरासे यांनी तर व्ही.एम. गिरासे यांनी आभार मानले. या मेळाव्यास संस्थेतील प्राध्यापक व कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थींनी तसेच विविध कंपन्याचे प्रमुख व प्रतिनिधी मोठया संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरत आहे रुग्णांसाठी आशेचा किरण !

वृत्तसंस्था ■ चंद्रपूर



चंद्रपूर : जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्ण तसेच उपचारासाठी पुरेसा आर्थिक आधार नसलेल्या कुटुंबाना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमुळे मोठा दिलासा मिळत आहे. गत सहा महिन्यात जिल्ह्यातील ३७ रुग्णांना ३३ लाख ३६ हजार रुपयांची मदत देण्यात आली असून या कुटुंबासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आशेचा नवा किरण ठरला आहे.

चंद्रपूर येथील प्रशासकीय इमारतीमध्ये १ मे २०२५ रोजी राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील ३७ रुग्णांना ३३ लाख ३६ हजाराची मदत देण्यात आली आहे. विशेष म्हणजे आर्थिक अडचणीत असलेल्या रुग्णांचे जीव वाचले आहेत. तसेच कॅन्सर व हृदयशस्त्रक्रिया केलेल्या अनेक रुग्णांवर वेळेवर उपचार होऊ शकले.

या आजारांवरील उपचारासाठी मिळते मदत : या निधीतून कॉकलियर इम्प्लांट/अंतस्त कर्ण रोपण शस्त्रक्रिया, हृदय प्रत्यारोपण , यकृत प्रत्यारोपण , मूत्रपिंड प्रत्यारोपण , फुप्फुस प्रत्यारोपण , अस्थीमज्जा प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण , खुब्याचे प्रत्यारोपण , कॅन्सर शस्त्रक्रिया, कॅन्सर किमोथेरपी आणि रेडिओथेरपी, अस्थिबंधन, नवजात शिशुचे संबंधित आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, दुचारीवरील अपघात, लहान बालकाच्या संबंधित शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस जळीत रुग्ण, विद्युत अपघात/ विद्युत जळीत रुग्ण अशा गंभीर व जीवघेण्या आजारांवरील उपचारासाठी मदत दिली जाते. याशिवाय, मदत न मिळाल्यास महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम यासारख्या पर्यायी योजनांची माहितीसुध्दा रुग्णांना देण्यात येते.

योजनेसाठी पात्रता व निकष : अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा. त्याची आर्थिक परिस्थिती दुर्बल असावी. (रुपये १.६० लाख प्रती वर्ष पेक्षा कमी असणे आवश्यक आहे). रुग्ण सरकारी/धर्मादाय/मान्यता प्राप्त रुग्णालयात उपचार घेत असावा.

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : डॉक्टरांचे आजारावरील प्रमाणपत्र, हॉस्पिटलच्या खर्चाचे अंदाज पत्रक, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रुग्णाचे आधार कार्ड/ लहान बालकाच्या बाबतीत बालकाच्या मातेचे आधार कार्ड, रुग्णाचे रेशनकार्ड, संबंधित व्याधी विकार/ आजाराच्या संबंधी निदानात्मक तथा उपचारात्मक बाबींची कागदपत्रे, अपघातग्रस्त रुग्णांच्या बाबतीत एफ.आय.आर रिपोर्ट, अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया अपेक्षित असलेल्या रुग्णांसाठी विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीचे प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असलेले अधिवास प्रमाणपत्र आवश्यक. अर्जदारांनी ही कागदपत्रे प्रशासकीय इमारत, पहिला माळा मुख्यमंत्री सहाय्यता कक्षात थेट जमा करावीत.

अर्ज करण्याची प्रक्रिया : संबंधित रुग्णालयातून प्रस्ताव तयार केला जातो. तो वैद्यकीय अधिकारी जिल्हा मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मंत्रालयात पाठवला जातो. समिती परीक्षण करून निधी मंजूर करते. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष हा चंद्रपूर येथील प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या माळ्यावर वैद्यकीय अधिकारी डॉ. कविश्वरी कुंभलकर यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक भास्कर झळके यांच्या देखरेखीखाली सुरू आहे. रुग्णांसाठी जीवनदायी ठरलेल्या या कक्षाचा जिल्ह्यातील गरजू रुग्णांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. कुंभलकर यांनी केले आहे.

बुद्ध लेणी संवर्धन समितीच्यावतीने लाक्षणिक धरणे आंदोलन

सातारा ■ अनिल वीर



सातारा : राज्यातील बुद्ध लेणींच्या अतिक्रमणाबाबत पुरातत्व विभागाच्या निष्क्रियतेविरोधात मुंबईतील आझाद मैदानावर बुद्ध लेणी संवर्धन समिती,महाराष्ट्र यांच्या नेतृत्वाखाली आणि सर्व लेणी संवर्धक समूह यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन मोठ्या संख्येनी संपन्न झाले.

यावेळी दीपक गायकवाड, विवेक वाघमारे, विजय खुडे, प्रशांत माळी,अर्जुन काटे, सारिका कांबळे,अनिल जाधव, प्रभाकर जोगदंड, गणेश व्हावळ, समाधान सोनावणे,अनेक कार्यकारणी सदस्य-सभासद, भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.?ड.भीमराव आंबेडकर, सनातन धम्म प्रा.डॉ. विलास खरात, राज्यभरातून लेणी संवर्धक, अभ्यासक, पुरातन वास्तू प्रेमी आणि बौद्ध समाज मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

आंदोलनात भारतीय पुरातत्व विभाग (एएच) यांच्यावर लेण्यांकडे जाणूनबुजून डोळेझाक केल्याचा आरोप करण्यात आला.भारतातील प्रमुख १२०० बुद्ध लेण्यांपैकी अनेक लेण्या अतिक्रमण, दुर्लक्ष आणि विद्रुपीकरणाच्या विळख्यात सापडल्या आहेत. भारतीय पुरातत्व विभाग बुद्ध वारसा संपवण्याचा कट करत असल्याचा संशयही यावेळी आंदोलनकर्त्यां ५० संघटनांकडून व्यक्त करण्यात आला.

आंदोलनात पुढील मागण्यांचे निवेदन सरकारला देण्यात आले. बुद्ध लेण्यांवरील अतिक्रमण केव्हा काढणार ? बेवारस बुद्ध लेणी आणि स्तूपेंएच मध्ये केव्हा समाविष्ट होणार ? बुद्ध लेण्यांच्या विकासासाठी निधी कुठे जातो ? प्रशिक्षित गाईडची नेमणूक केव्हा होणार ? लेण्यांवर मूलभूत सुविधा पाणी, वीज, रस्ते, स्वच्छतागृह, बेंच कधी उपलब्ध होणार ? लेणी परिसरातील १०० मीटरमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर बांधकामांना जबाबदार कोण ? इतर पुरातन वास्तूंप्रमाणे लेण्यांना 'बुद्ध लेणी' म्हणून नामफलक का नाही ? लेण्यांचा ऐतिहासिक माहिती फलक का लावला जात नाही? अशा अनेक मागण्या करण्यात आल्या.जर तीन महिन्याच्या आत मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर मोठ्या प्रमाणात तीव्र आंदोलन करू ! असा इशारा बुद्ध लेणी संवर्धन समिती महाराष्ट्र राज्य यांनी देण्यात आला.या आंदोलनात राज्यातील विविध लेणी संवर्धकांचा सहभाग होता. महाराष्ट्रातील बुद्ध लेण्यासंवर्धन तसेच सातारा जिल्ह्याच्यावतीने अनेक विविध मागण्यासाठी बौध्द युवा जागृती परिषद, कराड व सह्याद्री लेणी संवर्धक समूह, वाईचे रोहित वाघमारे (वाई) व कैलास कांबळे (कराड),श्रीधर गोखले,आनंदा कांबळे, स्वप्नील जाधव, महेश सोनवणे, अर्णव असे अनेक युवा कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते. त्यांनी सातारा जिल्ह्यातील बौध्द लेण्यांच्या विकास कामांची मागणी करत या आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला.कैलास कांबळे यांनी आभार मानले.

मोफत गणवेश वाटप व फुंडे विद्यालयात विविध समित्या पुनर्गठीत



दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे

उरण : रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत इयत्ता ५ वी ते १० वी मधील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना सारिका पाटील -बोकडविरा, चंद्रविलास घरत भेंडखळ, निलेश ठाकूर शिवाजी नगर यांच्या मार्फत गणवेश देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य साळुंखे बी.बी. यांनी केले. विविध स्पर्धा परीक्षा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न केले जात आहेत असे प्रतिपादन केले.

प्रसंगी उपस्थित प्राचार्य साळुंखे बी.बी. उपमुख्याध्यापिका थोरात एस.डी,पर्यवेक्षिका बाबर एस. एम, पाटील एस.एस,सारिका पाटील, चंद्रविलास घरत, निलेश ठाकूर, सतीश घरत, प्रांजल भोईर, विकास शर्मा, निलेश झावरे, नितिन साखरे, व सेवक वृंद यांचा सन्मान करण्यात आला. त्या नंतर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते गणवेशाचे वाटप करण्यात आले.

या वेळी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विविध शालेय समिती पुनर्गठीत करण्यात आल्या. विविध समित्यांची माहिती विभाग प्रमुखांनी दिली. शाळा व्यवस्थापन - गावंड व्ही. व्ही., माता पालक संघ- खारपाटील एम.एम., पालक शिक्षक संघ- पाटील पी.ए. व शालेय पोषण आहार नाईक एस.डी,नवभारत साक्षरता - पाटील एच. एन., ईंइ व गुरुकुल म्हात्रे ए. आर. तंबाखू नियंत्रण समिती यांची निवड झाली.यावेळी नितीन साखरे,निलेश झावरे वैद्यकीय अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.सर्व समिती सभेसाठी पालकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला होता.

प्रत्येकाचा कौशल्य विकास झाला पाहिजे - संपतराव देशमुख
उंब्रज येथे जागतिक युवा कौशल्य दिन उत्साहात साजरा

उंब्रज ■ कुलदिप मोहिते



उंब्रज कराड : उंब्रज येथील एशियन टेक्निकल इन्स्टिट्यूट च्या माध्यमातून आजवर हजारो विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण मिळाले आहे ते स्वतःच्या पायावर उभे आहेत. संस्थेचे संस्थापक स्वर्गीय जयवंतराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील तरुणांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. प्रत्येकाचा कौशल्य विकास झाला पाहिजे या धारणेतून संस्थेची वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन उद्योजक संपतराव देशमुख यांनी केले.

उंब्रज ता. कराड येथील एशियन टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक युवा कौशल्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी उद्योजक संपतराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले. संस्थापिका संगीता चव्हाण टीव्ही मालिका व चित्रपटातील विनोदी कलाकार रोहित चव्हाण प्रशिक्षक शेवाळे पत्रकार प्रवीण कांबळे , रवींद्र वाकडे, अभिजीत काटवटे व विद्यार्थी उपस्थित होते.

संपतराव देशमुख म्हणाले, आज बेरोजगारीची समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे यावर मात करण्यासाठी शासनाने कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता या धर्तीवर युवकांना मोफत व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची नाविन्यपूर्ण योजना आणली असून, यामुळे अनेक बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळाले आहे. एशियन टेक्निकल इन्स्टिट्यूट ने उंब्रज परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना हे कौशल्य प्रशिक्षण दिले असून जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी या संस्थेतून उत्कृष्ट व्यावसायिक तयार होत आहेत.

अभिनेते रोहित चव्हाण म्हणाले कला, कौशल्य हा माणसाचा अंगभूत गुण असून या कौशल्याला अधिक विकसित करण्यासाठी योग्य प्रशिक्षण मिळण्याची गरज असून ते काम एशियन टेक्निकल च्या माध्यमातून होत आहे. यावेळी जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच प्रमाणपत्र वाटप करण्यात आले संगीता चव्हाण यांनी आभार मानले.

खाण आंदोलनाबाबत राज्य शासनाची उदासीनता - आंदोलनकर्ते आंदोलनाला वाईकरांचा वाढता पाठिंबा

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : मागील सहा दिवसांपासून १०० किमी पायी चाललेल्या या स्टोन क्रेशर विरोधातील लॉंग मार्चला पुणे येथील विभागीय आयुक्त सन्मानपूर्वक तोडगा काढू शकतील अशी आशा आंदोलनकर्त्यांबरोबरच संपूर्ण वाई तालुक्याला लागून होती. मात्र आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेमध्ये आयुक्तांनी यावर सातारा जिल्हा अधिकारीच निर्णय घेऊ शकतील अशी माहिती शिष्टमंडळा सोबत झालेल्या बैठकीत दिली. आंदोलनकर्त्यांचे शिष्टमंडळ आयुक्तांना भेटल्यावर त्यांनी कागदोपत्री आपली भूमिका आयुक्तांसमोर मांडली. दगड खाण व क्रशर बेकायदेशीर असल्याबाबत सर्व पुरावे आयुक्तांना दाखवण्यात आले. हे सर्व बघितल्यानंतर आयुक्त यांनी आपण पुन्हा सातारा जिल्हाधिकारी यांच्याकडे दाद मागावे असे मिश्किल वक्तव्य केले.

यावर आंदोलक संतप्त झाले व बैठक संपल्यावर पोलिसांनी आम्हाला अटक करावी म्हणत पोलिस गाडीत चढले. पोलिसांनी आंदोलकांचे सांत्वन करत आपण कायदेशीर आंदोलन करत रहा अशी विनंती आंदोलकांना केली.

शिष्टमंडळामध्ये स्वप्निल भाई गायकवाड,विराज भैया शिंदे, विकी पार्टे, स्मिता वरे, अजित वरे, रुपेश पार्टे, धनश्री पार्टे इत्यादी उपस्थित होते.

एका बाजूने शासन आंदोलनकर्त्यांना सहकार्य करताना दिसत नाही असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे मात्र दुसऱ्या बाजूने वाई तालुक्यातून आंदोलनास पाठिंबा वाढताना दिसत आहे. आज वाई तालुक्यातील अनेक लोक लॉन्ग मार्चमध्ये सहभागी झाले. यामध्ये राजकीय सामाजिक क्षेत्राबरोबर सर्वसामान्य नागरिक सुद्धा या लॉन्ग मार्च मध्ये दिसून आले. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये शासनाने याची दखल घेतली नाही तर वाई तालुक्यातून मोठ्या प्रमाणात नागरिक मुंबईच्या दिशेने लॉंग मार्चमध्ये सहभागी होण्यासाठी येऊ शकतात.

आजच्या लॉन्ग मार्चमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या पक्षाच्या वतीने डॉक्टर नितीन सावंत यांनी आपला पाठिंबा जाहीर केला. त्याचबरोबर शिवसेना पक्षाकडून विकास आण्णा शिंदे,प्रदीप माने, रवींद्र आप्पा भिलारे उपस्थित होते त्याचबरोबर सोशल मीडियाच्या माध्यमातून मावळा प्रतिष्ठान यांच्यासारख्या अनेक सामाजिक संघटनांनी आपले समर्थन या लॉन्ग मार्चला लेखी स्वरूपात दिले आहे.शासनाच्या चुकीच्या वागणुकीमुळे आंदोलनकर्त्यांनी आजचा मुक्काम रस्त्यावर करण्याचा निर्णय घेतला आहे.

उरणमध्ये 'रत्नागिरी ८' भात वाणाची ४ सूत्री पद्धतीने लागवड: शेतकऱ्यांना आधुनिक तंत्राचे मार्गदर्शन

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे



उरण : उरण तालुक्यातील आवरे गावातील शेतकरी काळुराम पोशीराम गावंड यांच्या शेतात रत्नागिरी ८ या भात वाणाची ४ सूत्री पद्धतीने यशस्वीरित्या लागवड करण्यात आली. तालुका कृषी अधिकारी श्रीमती अर्चना सूळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रायोगिक उपक्रम राबवण्यात आला.

या प्रात्यक्षिकादरम्यान, उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांना ४ सूत्री भात लागवड पद्धतीबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच या आधुनिक लागवड पद्धतीमुळे होणारे विविध फायदे समजावून सांगण्यात आले.

चार सूत्री भात लागवड पद्धतीचे फायदे:-

उत्पादन वाढ: या पद्धतीमुळे भाताचे उत्पादन वाढण्यास मदत होते.

पाण्याचा कार्यक्षम वापर:- पाण्याची बचत होते आणि पाण्याचा अधिक प्रभावीपणे वापर होतो.

खतांचा योग्य वापर:- खतांचा योग्य वापर होऊन त्यांची कार्यक्षमता वाढते.

रोग आणि कीड नियंत्रण:- पिकांवरील रोग आणि किडींचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.

श्रम आणि वेळेची बचत:- पारंपरिक पद्धतीपेक्षा कमी वेळात आणि कमी श्रमात लागवड करता येते.

प्रहार जनशक्ती पक्षाच्या जिल्हा अध्यक्षपदी राहुल वाळके यांची निवड

रांजणगाव गणपती ■ प्रतिनिधी



पुणे : रांजणगाव गणपती (करंजावणे), तालुका शिरुर जिल्हा पुणे येथील राहुल सुरेश वाळके यांची प्रहार जनशक्ती पक्षाच्या पुणे जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले आहे. रांजणगाव गणपती येथील राहुल वाळके यांनी विविध सामाजिक कामे करत दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्य केले असून त्यांनी प्रहार कार्यकर्ता,तालुकाध्यक्ष, पुणे जिल्हा उपाध्यक्ष असे यापूर्वीच काम पाहिले आहे. त्यांच्या याच सर्व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची प्रहार जनशक्ती पक्षाच्या पुणे जिल्हा अध्यक्षपदी निवड करत आली आहे. अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

कामोठे येथे रयतच्या मुख्याध्यापकांची सविचार सभा संपन्न

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे



उरण : नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी व शाखाप्रमुख भूमिका या विषयावर रायगड विभागीय कार्यशाळा रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभाग प्राचार्य व मुख्याध्यापक कार्यशाळा सोमवार दिनांक २१/७/२०२५ रोजी रायगड विभागीय चेअरमन माजी आमदार बाळाराम पाटील यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली. सदर प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिग कौन्सिल सदस्य माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित राहून प्राचार्य व मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेसाठी सातारा येथून माहिती अधिकारी व नवीन शैक्षणिक धोरण तज्ञ शिवाजी राऊत यांनी नवीन शैक्षणिक धोरण व माहिती अधिकार या वर दोन सत्रात प्रभावी मार्गदर्शन करून प्रशासकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे निराकरण केले. रयत शिक्षण संस्थेचे कायदा अधिकारी विनोद गोडगे यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी विभागीय चेअरमन यांनी गुणवत्ता वाढ,आणि शिक्षण धोरण यावर मार्गदर्शन करून सर्व सेवकांचे पाठीशी रयत शिक्षण संस्था व आम्ही पदाधिकारी असून सर्व शाळा इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्ड युक्त लवकरच होतील असा विश्वास प्रकट केला. मान्यवरांचे हस्ते नवोदित प्राचार्य व मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला. विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्थेची ध्येयधोरणे व गुणवत्ता या बाबत विचार प्रकट केले. संस्था मॅनेजिग कौन्सिल सदस्यां ठाकूर मॅडम,लाईफमेंबर कोळी,लाईफ वर्कर महेश पाटील, वाशी कॉलेज प्राचार्या नायक मॅडम, वीर वाजेकर कॉलेज प्रभारी प्राचार्य आमोद ठक्कर व विभागातील आश्रम शाळांचे माध्यमिक शाळांचे मुख्याद्यापक उपस्थित होते. मुख्याद्यापक डी सी पाटील यांनी उत्तम सुत्रसंचालन तर सहाय्यक विभागीय अधिकारी जगताप सर यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमातून जेई ,नीट,स्पर्धा परीक्षाची मांडणी केली गेली. रायगड विभागीय कार्यालयीन सेवकांचे या प्रसंगी मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचीही उपस्थिती मोलाची होती. एकंदरीत अत्यंत उत्साहात व उत्तम प्रतिसादात कार्यशाळा संपन्न झाली.

कंधारकरानी रक्तदानातुन दिल्या मुख्यमंत्री फडवणीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा..! ; प्रदेश सचिव देविदास राठोड यांचे प्रतिपादन

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार: महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्याकरिता सामाजिक उपक्रम राबवत भारतीय जनता पार्टी कंधारच्या वतीने रक्तदान करून सामाजिकतेची जाण ठेवत रक्तदानाने अनोख्या शुभेच्छा दिल्या असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव देविदास राठोड यांनी रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्व भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांना आवाहन केले मुख्यमंत्र्याचा वाढदिवस हा बॅनर बाजी न करता सामाजिक उपक्रम राबवत रक्तदान करून करावा असे सांगितले त्या निमीत्त संबंध महाराष्ट्रभर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येक मंडळात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे,त्याच निमित्त भारतीय जनता पार्टी कंधार उत्तर मंडळ, कंधार दक्षिण मंडळ व कंधार शहर मंडळ यांच्या वतीने दिनांक २१ जुलै रोजी महाराणा प्रताप चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले यावेळी ११२ रक्तदात्यांनी रक्तदान केले या रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक देविदास भाऊ राठोड यांनी उपस्थित त्यांना रक्तदान केल्याबद्दल शुभेच्छा दिल्या व या अनोख्या उपक्रमाची प्रशंसा केली.

या रक्तदान शिबिराचे आयोजन भारतीय जनता पार्टी कंधार शहर मंडळ, कंधार दक्षिण व कंधार उत्तर मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या शिबिराचे उद्घाटन भाजप प्रदेशाच्या चिटणीस देवीदास भाऊ राठोड यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ११२ रक्तदात्यांनी रक्तदान केले या वेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस चित्रलेखाताई गोरे, राष्ट्रीय परिषद सदस्य धोंडीबा भायेगावे,दक्षिण मंडळ अध्यक्ष अड विजय धोंडगे, कंधार उत्तर मंडळाध्यक्ष बालाजीराव पांडागळे, कंधार शहराध्यक्ष अड गंगाप्रसाद यन्नावार, लोहा उत्तर मंडळ अध्यक्ष शरद पवार, माझी पंचायत समिती सदस्य डॉ सुनील धोंडगे, माझी पंचायत समिती सदस्य उत्तम चव्हाण, पंचायत समितीचे सदस्य सत्यनारायण मानसपूरे, दत्ता करामुंगे, आनंदराव किडे, दत्तात्रेय पेठकर, व्यंकट गव्हाणे नागोराव पाटील मोरे एजाज पटेल गोविंदराव कपाळे शोकराव गोरे ,संभाजीराव घुगे ,अभिजीत इंदुरकर ,सागर डोंगरजकर, प्रवीण बनसोडे ,अरविंद वसमतकर, भारत पाटील कदम, अनिल मोरे, शरद भागानगरे ,जयराम कांबळे, सरपंच गणपत गायकवाड,अनिल फरकंडे, सुहास दिग्रसकर, संतोष कराळे यांच्या सह भाजप कार्यकर्ते पदाधिकारी यांची उपस्थिती होती. रक्त संकलन नंदिग्राम ब्लड सेंटर नांदेड यांनी केले यावेळी ब्लड सेंटरचे संपर्क अधिकारी आनंद लोणे व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.

ॲड.वर्षाताई देशपांडे यांचे सातारा नगरीत जोरदार स्वागत !



सातारा ■ प्रतिनिधी

सातारा : दलित महिला विकास मंडळाच्या सचिव ॲड. वर्षा देशपांडे यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या (युएनओ) वतीने 'युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन अवॉर्ड २०२५' हा पुरस्कार न्यूयॉर्क येथे झालेल्या कार्यक्रमात नुकताच प्रदान करण्यात आला.त्यानंतर त्या सातारा नगरीत येताच शिवतीर्थावर विविध संघटनांच्या मान्यवरांनी जोरदार स्वागत केले.

लिंगभेदाच्या आधारे होणाऱ्या गर्भलिंग निवडी विरोधातील ॲड. वर्षा देशपांडे यांच्या संघर्षाची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली. गर्भलिंग निवडी विरोधातील कार्यामध्ये त्यांनी क्षमतावाढ, जनजागृती, कायदेशीर कारवाई आणि समुदाय सहभाग या सर्व स्तरांवर भरीव कामगिरी केली आहे. यापूर्वी,हा पुरस्कार देशाला वैयक्तिक श्रेणीत तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी व उद्योजक जे. आर. डी. टाटा यांच्या माध्यमातून मिळालेला होता.ॲड. देशपांडे यांनी शिवतीर्थावर येताच छ. शिवराय यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हार,पुष्पगुच्छ,भेटवस्तू,शालवैगरे देऊन ?ड.वर्षाताईंचा सत्काराबरोच अभिनंदन करीत होते. संपूर्ण परिसर यात्रेच्या गर्दीसारखा फुलून गेला होता. मुक्तांगण येथे उत्स्फूर्तपणे महिलांनी ?ड.वर्षाताई यांच्यासह नाच-गाणी आनंदाने सादर केली. रात्री उशिरापर्यंत निवासस्थानी अभिनंदन करण्यासाठी वर्दळ होती.

बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या शाही संदलात गर्दी जमली

१०३ वा वार्षिक उर्स मोठ्या आनंदात साजरा होत आहे; दस्तरबंदीनंतर बाबांच्या संध्याकाळी सुफियाना कलाम पठण

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या १०३ व्या उर्सानिमित्त, २६ तारखेला बाबा ताजुद्दीन ट्रस्टतर्फे शाही दरबारी संदल काढण्यात आला. बाबा ताजच्या शाही संदलात भाविकांची गर्दी जमली. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी भक्तीभावाने बाबा ताजुद्दीनच्या संदलात सहभाग घेतला. संदलात सहभागी होणाऱ्या भाविकांच्या सोयी लक्षात घेऊन ताजबाग ट्रस्टने ताजबागमध्ये सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. प्रशासनानेही उत्कृष्ट व्यवस्था केली होती. विशेषतः पोलिस विभागाची भूमिका महत्त्वाची होती.

बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या दर्ग्याचे सज्जादा नशीन सय्यद युसूफ इकबाल ताजी यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयात दस्तरबंदी समारंभाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पाहुण्यांना पगडी घालण्यात आली. त्यानंतर प्रसिद्ध कव्वालांनी बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या सन्मानार्थ मेहफिल शमामध्ये सुफियाना कलाम सादर केले. त्यानंतर हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान परंपरेनुसार पवित्र चप्पल आणि चादर डोक्यावर घेऊन पुढे गेले. त्यानंतर ट्रस्टचे सचिव ताज अहमद राजा यांनी त्यांच्या डोक्यावर चप्पल आणि चादर ठेवून पुढे गेले. यासह, चप्पल ताजबाग ट्रस्ट कार्यालयातून मोठ्या थाटामाटात भाविकांच्या उपस्थितीत निघून गेली. यावेळी हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, ट्रस्ट हाजी फारुखभाई बावला, गजेंद्रपाल सिंग लोहिया, हाजी इम्रान खान ताझी, मुस्तफाभाई टोपीवाला यांच्यासह सय्यद जरबीर बाबा ताजी, हजरत बाबा ताजबागचे अध्यक्ष मोहम्मद खुर्शीद शाह, मुस्तफाभाई टोपीवाला आदी उपस्थित होते. खुद्दम दर्गा ट्रस्ट सय्यद मोबीन ताजी यांची प्रमुख उपस्थिती होती. बाबा ताजुद्दीन रहमतुल्ला अलैह यांची शाही चंदन ताजबाग, उमरेड रोड, सक्करदरा चौक, अशोक चौक, महाल, गांधीगेट, चिटणीस पार्क, भालदारपुरा चौक, गांधीबाग डागा हॉस्पिटल चौक, इतवारी मार्गे पार पडली. यावेळी ठिकठिकाणी चंदनाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. गस्त घालत चप्पल परत हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्ला अलैह यांच्या दर्ग्यापर्यंत पोहोचली. हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टच्या वतीने बाबांच्या समाधीवर चंदन आणि चादर अर्पण करण्यात आली. यावेळी दर्ग्यात भाविकांची मोठी गर्दी होती. त्यानंतर मोठ्या संख्येने भाविकांनी प्रार्थनेत भाग घेतला.

भाविकांना लंगर वाटप

बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या वार्षिक उर्सनिमित्त ट्रस्टकडून लंगर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सव्वीसव्या दिवशी भाविकांना लंगर वाटप करण्यात आले. याशिवाय ताजबागमध्ये विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मिलाद, कव्वालीसाठी गर्दी जमली

ताजबागमध्ये शाही संदल परतल्यानंतर मिलाद शरीफचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले होते. रात्री हजारो भाविक कव्वाली कार्यक्रमात जमले.

छोटा कुल शरीफची फतेहा २३ रोजी होणार आहेबाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांची वार्षिक छोटा कुसल शरीफ फतेहा २३ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता दर्ग्यात होणार आहे. याशिवाय रात्री ईशाच्या नमाजानंतर मिलाद शरीफ, नाटिया मनकबती मुशायरा आणि कव्वालीचे आयोजन केले जाईल. ट्रस्टने सर्व भाविकांना यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

पत्रकार बंधुच्या वाढदिवसानिमित्त सुरु केला एक उपक्रम ..... एक झाड माझ्या पत्रकार बंधु साठी नाना पाटील सर



भुसावळ ■ प्रतिनिधी

भुसावळ : भुसावळ शहरातील आवाज जनतेच्या न्युज चॅनेल चे संपादकाच्या वाढदिवसाचे औचित्य साधत

पर्यावरण जागर प्रतिष्ठान चे कार्याध्यक्ष , शैक्षिक आगाज चे राज्य समन्वयक, टिम हिरवांकुर चे जिल्हा अध्यक्ष , हरित भुसावळ स्वच्छ भुसावळ संकल्पना राबविणारे नाना पाटील सर यांनी भुसावळ शहरातील आवाज जनतेचा या न्युज चॅनेल चे संपादक कलिम पायलट यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकार बंधुच्या हस्ते एक वृक्ष माझ्या पत्रकार बंधुसाठी ही संकल्पना मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्याप्रमाणे एक पेड माँ के लिए याच संकल्पनेवर आधारीत एक पेड पत्रकार बंधु के लिए ही संकल्पना सुरु करून विविध पत्रकार बंधु व नागरिकांच्या माध्यमातून १५ झाडे लावण्यात आली यावेळी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष प्रेम परदेशी लोकमत चे छायाचित्रकार श्याम गोविंदा ,देशदुतचे मनोहर लोणे सर, संघर्ष माझा न्युज चॅनेल चे संपादक सुनिल आराक, दैनिक महाराष्ट्र सारथी चे नाना पाटील , भाग्यवेद ?केडेमी चे संचालक निळे सर, फालक स्पोर्टचे गामोर फालक, स्झझी क्वीक सर्विस चे संचालक श्री धांडे साहेब व नागरिकांच्या हस्ते ही वृक्षारोपन करण्यात आले .

यावेळी उपस्थित नागरिकांनी व सर्व पत्रकार बंधुनी पत्रकार कलीम पायलट यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देऊन पत्रकार बंधुसाठी एक झाड या उपकमाचे ही उपस्थित पत्रकार बंधुनी व नागरिकांनी कौतुक केले .

रेती चोरीचा पर्दाफाश; १५ लाखांचा टिप्पर आणि रेती जप्त

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा : तुमसर - तुमसर पोलिसांनी अवैध रेती वाहतुकीविरोधात धडक कारवाई करत एक टिप्पर जप्त केला आहे. या कारवाईत ६ ब्रास रेती आणि टिप्पर असा एकूण १५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई दिनांक २० जुलै रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास नाकाबंदी दरम्यान करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तुमसर पोलीस स्टेशन अंतर्गत पहाटेच्या वेळी नाकाबंदी सुरू होती. यावेळी टिप्पर क्रमांक एम्एच४०बीजी८७२६ ला थांबवून तपासणी केली असता, त्यात अवैधपणे वाहतूक केली जाणारी रेती आढळून आली. चालकाची चौकशी केली असता, मालकाच्या सांगण्यावरून गोंदिया जिल्ह्यातील वैनगंगा नदीच्या पात्रातून ६ ब्रास रेती (किंमत ३०,००० रुपये) चोरून आणल्याचे त्याने कबूल केले. पोलिसांनी तात्काळ रेतीसह १५ लाख रुपये किमतीचा टिप्पर जप्त केला.

याप्रकरणी, आरोपी चालकाविरुद्ध पोलीस स्टेशन तुमसर येथे अपराध क्रमांक ४६९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ४९ आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(८) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक नूरुल हसन, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक गायकवाड यांच्या नेतृत्वात, पोलीस उपनिरीक्षक बावणे आणि त्यांच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास तुमसर पोलीस स्टेशनचे अधिकारी करत आहेत. या कारवाईमुळे रेतीमाफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

बँक ऑफ इंडिया च्या वतीने दोन लाखाचा चेक वितरित



तळेगाव ■ प्रतिनिधी

तळेगाव : मृतक मनोज हिरुडकर यांनी बँक ऑफ इंडिया शाखा आष्टी इथून बँक मित्र याच्या कडून झ्श्ँभ (प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना) यांनी बँक मित्र अनिल इंगळे याच्या कडून काढला होता काही आजाराने मनोज हिरुडकर याचे निधन झाले असता त्याच्या पत्नी प्रिती मनोज हिरुडकर यांनी बँक ऑफ इंडिया शाखा याच्या सोबत आणि बँक मित्र अनिल इंगळे याच्या सोबत भेटून बँक ऑफ इंडीया शाखा आष्टी इथे जाऊन बीमा ची सर्व डाक्युमेंट करून बीमा रकमेचा क्लेम केला आणि काही दिवसांनी विमा क्लेम प्रीती मनोज हिरुडकर याना भेटला. झ्श्ँभ बीमा ची २००००/-(दोन लक्ष रुपये)माननीय प्रमुख पाहुणे श्री. टंडन(उउश,इउश्ध,झ्ल्हा), श्री. राहुल अवसरे (उँशैंमदनैब,झ्ँप्दहा), श्री खाडीलकर (एश ,झ्ँप्दहा) यांच्या हस्ते तसेच बँक मॅनेजर क्षितिज गायकवाड साहेब व बँक ?डमिन सारिका मॅडम, व अनिल इंगळे, सचिन झाडे,शुभम केवटे , अरविंद विजेकर, शुभम झाडे,तसेच प्रमुख पाहुणे याच्या हस्ते २ लक्ष देण्यात आला आणि मुलांना सारिका मॅडम याच्या कडून लहान मुलांना चॉकलेट देऊन सांगता केली...

गुमथी येथील दिव्यज्योती मतिमंद मुलामुलींची विशेष शाळा व कर्मशाळेमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट भाजपा आघाडी नागपूर तर्फे साजरा

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : साई कल्याणकारी शिक्षण प्रसारण संस्था गुमथी द्वारा संचालित दिव्यज्योती मतिमंद मुलामुलींची विशेष शाळा व संत सिताराम महाराज प्रौढ मतिमंदाची निवासी कर्मशाळा व पुनर्वसन केंद्र गुमथी, ता. कामठी, जि. नागपूर येथील शाळा व कर्मशाळेला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट भाजपा आघाडी नागपूर तर्फे साजरा करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमाला मुकुंद दुबे, उपाध्यक्ष महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट आघाडी, नागपूर. श्रीकांत दुबे,भा.ज.पा. प्रदेश संयोजक महाराष्ट्र केमिस्ट फार्मासिस्ट आघाडी, धनंजय जोशी, उपाध्यक्ष. महाराष्ट्र स्टेट फार्मासी काउन्सिल, हेतल ठक्कर, बबन पडोळे, अविनाश राव, सुभाष मंगतानी, राजू खंडेलवाल, वीवेक गुप्ता, विक्रम दर्यनी, अनिल जोशी, योगेश भागलकर, शैलेश अग्रवाल, प्रितम शेंडे, गौरव लालवाणी, महेश फुटाणे, सचिन जांभुळकर, डोनाल्ड ढोमने , रुशीकेश किमतकर, श्रीमती निकिता गोडबोले तसेच शाळेचे मुख्याध्यापक पिलेश्वर मोरे व कर्मशाळेच्या व्यवस्थापकीय अधीक्षिका अंजली मोरे इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत समारोह झाल्यानंतर दिव्यांग विद्यार्थांसोबत मनोरंजनात्मक खेळ खेळून, चर्चा करून सर्व विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना अलपोहार देण्यात आला. शाळेला लागणारी औषध व प्राथमिक उपचार करिता सदैव सहकार्य करण्याचे आश्वासन दिले तसेच शाळा व कर्मशाळेची पाहणी करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

हुतात्मा राष्ट्रीय कनिष्ठ महाविद्यालयात कायदेविषयक शिबिर संपन्न

आष्टी ■ प्रतिनिधी



आष्टी : स्थानिक हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय आष्टी येथे सखी सावित्री समिती व तालुका विधी समिती अंतर्गत दिनांक २२ जुलै २०२५ रोजी कायदेविषयक मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या न्यायाधीश आदरणीय प्रियांका पटेल अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून ?ड.के.बी. मतले, ?ड.सौ चोपदार मॅडम, ?ड. चौधरी मॅडम उपस्थितीत होत्या . तर प्रमुख उपस्थितीत हुतात्मा राष्ट्रीय कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय पी.जी नागतोडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शहिदाच्या पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ?ड. के. बी. मतले यांनी मुलांचे हक्क व कायदे या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर ?ड .चोपदार मॅडम यांनी राईट टू एज्युकेशन, शिक्षण हक्क कायदा २००९ अंतर्गत बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार या विषयी मार्गदर्शन करताना आपण सर्वांनी हा शिक्षणाचा अधिकार सर्वांपर्यंत पोहोचवा जेणेकरून कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही असे प्रतिपादन केले. ?ड .चौधरी मॅडम यांनी बेटी बचाओ बेटी पढाओ या विषयावर तर ?ड. वाघ मॅडम यांनी झ्ध्ण्ए ?क्ट विषयी माहिती देऊन सखोल असे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात मनोगत व्यक्त करताना मा. न्यायाधीश पटेल मॅडम यांनी बाल कायदा ?क्ट २०१५ हा भारतातील मुलांसाठी कायद्याची व्यवस्था असून हा कायदा मुलांची काळजी व संरक्षण करतो असे मत व्यक्त केले. या कायद्याविषयक शिबिराचे प्रास्ताविक प्राचार्य पी.जी नागतोडे सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.शितल चोरे यांनी तर आभार उपमुख्याध्यापिका सौ.विणा तांबासकर मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला हुतात्मा शैक्षणिक परिवारातील सर्व विद्यार्थी ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

देवळी येथे पत्ते खेळून कृषिमंत्र्याच्या कृत्याचा केला निषेध

गौळ ■ योगेश कांबळे



गौळः मंगळवारी २३ जुलै रोजी बस स्टॅड चौक देवळी येथे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधानसभेत जंगली रमी खेळण्याच्या कृत्याचा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष किरण ठाकरे यांचे नेतृत्वात निषेध करण्यात आला.

यावेळी प्रतिकात्मक पत्ते पिसून रमी चा खेळ रंगवण्यात आला.

राज्यातील शेतकरी आज अक्षरशः जगण्यासाठी संघर्ष करतो आहे. निकृष्ट बियाण्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे. खते आणि औषधाचे भाव गगनाला भिडले आहेत, खतांचा तुटवडा आहे, लिंकिंग ने शेतकरी त्रस्त आहे, पिकाला हमीभाव नाही. अशा वेळी शेतकरी कर्जमाफीची याचना करतोय, जगण्याची झुंज देतोय आणि तिकडे आपल्या राज्याचे कृषिमंत्री विधिमंडळात ऑनलाईन रमी खेळत शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचं काम करतो असे किरण ठाकरे यांनी सांगितले. त्यानंतर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला चपला,जोडे मारून व कृषिमंत्र्याच्या प्रतिमेवर पत्ते उधळून शेतकऱ्यांनी आपला रोष व्यक्त केला. यावेळी बस स्टॅड चौकात पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. परिसरातील नागरिकांनी आंदोलन बघण्यासाठी प्रचंड गर्दी केली. यावेळी काही शेतकऱ्यांनी आपल्या भावना उपस्थितां समोर व्यक्त केल्या. उपस्थित शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्याविरोधात नारेबाजी करून परिसर दनाणून सोडला.

यावेळी किरण ठाकरे यांचेसह प्रविण कात्रे, गौतम पोपटकर, मनोज नागपुरे, किसना लोणकर, नानाजी इंगोले, गौरव खोपाळ, हणु पचारे, रामेश्वर जिवणे, कौस्तुभ पाचडे, मंगेश वरफडे, शरद भोयर, वृषभ गावंडे, सुरज भगत, गणेश ताकसांडे व इतर अनेक शेतकरी उपस्थित होते.

शाही संदलमध्ये कलाकार आणि धुमाळ पक्षांचे अद्भुत सादरीकरण असेल

देशभरातून भाविक ताजबागला पोहोचत आहेत; वार्षिक उर्समध्ये २५ लाख यात्रेकरूंसाठी लंगर वाटपाची व्यवस्था

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : शहनशाहे हफ्त अकलीम हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या १०३ व्या वार्षिक उर्समध्ये देशभरातून भाविक पोहोचत आहेत. हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टकडून वार्षिक उर्स साजरा केला जात आहे. येथे दररोज धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. उर्समधील सर्वात मोठा कार्यक्रम, शाही दरबारी संदल, मंगळवार, २२ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयातून मोठ्या थाटामाटात निघेल. शाही संदलमध्ये सहभागी होण्यासाठी देशभरातून भाविक ताजबागला पोहोचत आहेत. शाही संदलात आकर्षक बँड पार्टी, सुंदर घोडेस्वारी, देशातील विविध राज्यांतील कलाकारांचे सादरीकरण, धुमाळ पाट्यांचा कार्यक्रम असेल. भाविक या संदलात चप्पल आणि चादर घेऊन सामील होतील. संदल विविध मार्गांनी जाईल. संध्याकाळी ते ताजबागला पोहोचेल आणि बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या थडग्यावर चप्पल आणि चादर सादर केली जाईल. वार्षिक उर्स निमित्त, हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टकडून दररोज भाविकांना लंगर वाटप केले जात आहे. उर्स दरम्यान सुमारे २५ लाख भाविकांसाठी लंगर वाटपाची व्यवस्था ट्रस्टने केली आहे. लंगर जेवणाव्यतिरिक्त, वेगवेगळ्या ठिकाणी लंगर वाटप केले जात आहे. हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष श्री प्यारे झिया खान साहब, सचिव श्री ताज अहमद राजा साहब, उपाध्यक्ष श्री डॉ. सुरेंद्र जिचकर साहब, विश्वस्त श्री फारूखभाई बावला साहब, श्री गजेंद्रपाल सिंह लोहिया साहब, श्री मुस्तफाभाई टोपीवाला साहब, श्री हाजी इम्रान खान ताजी साहब यांच्या मार्गदर्शनाखाली शाही संदल तयार करण्यात आले आहे. सर्व आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत. ट्रस्टने सर्व भाविकांना संदलात सामील होण्याचे आवाहन केले आहे.

२३ जुलै २०२५ रोजी ताजबाग येथे नाटिया मुशायरा

हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या १०३ व्या वार्षिक उर्सनिमित्त, २३ जुलै २०२५ रोजी रात्री ९ वाजता ताजबाग दर्ग्याच्या प्रांगणात अखिल भारतीय मनकबती नाटिया मुशायरा आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये मिसम गोकलपुरी बिहार, खुर्शीद हैदर मुझफ्फर नगर, अल्ताफ झिया मालेगाव, शजर माखनपुरी उत्तर प्रदेश, समीर कबीर नगर आणि इतर अनेक प्रसिद्ध कवी नाटिया कलाम सादर करतील.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बाबा ताजुद्दीन यांच्या थडग्याला भेट दिली

हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या वार्षिक उर्समध्ये भेट दिल्यानंतर त्यांनी बाबांच्या थडग्याला भेट दिली आणि सुख आणि शांतीसाठी प्रार्थना केली. ताजबागच्या विकासावर भर देत त्यांनी सकारात्मक बदलावर विश्वास व्यक्त केला.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पालिकेतर्फे अंतिम तयारी !

सातारा ■ प्रतिनिधी



सातारा : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त सर्व समाज बांधव मोठ्या उत्साहात दि. १ ऑगस्ट रोजी अभिवादन करीत आहे. त्या पार्श्वभूमीवर पालिकेतर्फे पूर्ण तयारी करीत असल्याचे आश्वासन मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी दिले.

समितीतर्फे नियोजनार्थ शिष्टमंडळ पालिकेच्या कायालयात निवेदनाद्वारे मागणी करून सविस्तर चर्चा-विनिमय करण्यात आला. प्रथमतः शासकीय विश्रामगृहमध्ये कार्यकर्त्यांनी नियोजन केले होते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त शाहू चौक येथे पूर्णाकृती पुतळ्याचे काम पूर्ण नसल्याने जो पालिकेच्या आखत्यारीत अर्धकृती पुतळा राजवाडा येथे अभिवादन करण्याचे एकमताने ठरविण्यात आले. डॉ.आंबेडकर पुतळा व राजवाडा परिसरात पालिकेतर्फे मंडप व सुशोभीकरण करण्यात येणार आहे. पुतळा परिसरात प्रतिमेस अभिवादन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार स्वागत कमान लाईट, साउंड, डायस, फुलांचे डेकोरेशन, गाद्या, खुर्च्या उपलब्ध करून यथायोग्य सुशोभीकरण करून सुविधा उपलब्ध करण्यात देण्यात येणार आहेत. नगरपालिका अंतर्गत असणाऱ्या शाळा, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारीवृंद यांनी साहित्य दिंडीमध्ये सहभाग घेण्याबाबतही चर्चा करण्यात आली. सदरच्या निवेदनावर अध्यक्ष रावण तथा हृषीकेश गायकवाड, उपाध्यक्ष गौरी आवळे, गणेश वाघमारे, सतीश गाडे, संदीप कांबळे, के. सुचित्रा ,?ड. हौसेराव धुमाळ, उमेश खांझोडे व अनिल वीर यांच्या स्वाक्षरी आहेत. पालिकेत स्वाक्षरी धारकासह वंचितचे शहराध्यक्ष मिलिंद कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप कांबळे, किशोर गाल्फाडे आदी विविध क्षेत्रातील मान्यवर, जयंती उत्सव समिती, सर्व पक्ष संघटना व कार्यकर्ते मोठ्या संख्येनी उपस्थीत होते.

सफाई कामगारांच्या पाल्यांनी उद्योगाकडे वळावे : शेरसिंग डागोर



नागपूर,दिलीप येवले : वंचित घटकांतील लोकांना सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग शर्तीने प्रयत्न करत आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन सफाई कामगारांच्या मुलांनी आपले शिक्षण गुणवत्तेने पूर्ण केले पाहिजे. याचबरोबर स्वयंरोजगाराच्या दृष्टीने कौशल्य आत्मसात करुन विविध उद्योगधंदयाकडे वळण्याचे आवाहन राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक न्याय विभाग, महानगरपालिका व राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या संयुक्त विद्यमाने इमामवाडा येथे स्वच्छतादूत कल्याणकारी दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त आयोजित कार्यक्रमास विधान परिषद सदस्य संदीप जोशी, आमदार मोहन मते, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अजय चारठाणकर, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, राजेश भगत, विनोद जाधव उपस्थित होते.

सफाई कर्मचाऱ्यांची प्रगती व विकास होण्यासाठी नागपूरच्या धर्तीवर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात विशेष शिबीर घेण्याचा मानस अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना स्वच्छतादूतांबद्दल आपूलकी आहे. सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या मुख्यमंत्र्यांनी सोडविल्या. त्यांच्या प्रेरणेतून आज ७५ वर्षानंतर सफाई कर्मचाऱ्यांसाठी हा महोत्सव होत असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नामुळे प्रदिर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या लाडपागे समितीअंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना महानगरपालिकेत नियुक्ती पत्र देण्यात आले.

यावेळी आमदार मोहन मते यांनी आपले जीवनमान उंचावण्यासाठी सफाई कर्मचाऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा असे सांगितले. हा एक अभिनव उपक्रम असून या माध्यमातून सफाई कामगारांना विविध योजनांचा लाभ घेता आला, असे महापालिका आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी सांगितले. आरोग्य सेवा, घरकुल नोंदणी, रमाई घरकुल वाटप, स्वाधार योजना, ॲट्रासिटी अंतर्गत बळी पडलेल्या कुटुंबाच्या वारसांना पेंशन, जात वैधता प्रमाणपत्र, शिलाई मशिन आदी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना देण्यात आला.

समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या महाशिबीरास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या निमित्ताने विविध विभाग व महामंडळांनी स्टॉल लावले होते. शासकीय योजनांची मोठ्या प्रमाणात सफाई कर्मचाऱ्यांनी नोंदणी केली.

जिल्ह्यात २३ ते २६ जुलै कालावधीत मुसळधार पाऊस

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : भारतीय हवामान खात्याने नागपूर जिल्ह्यामध्ये २२ ते २६ जुलैपर्यंत जिल्ह्यात मुसळधार पाऊस, वादळीवारा, मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवलेली आहे. दिनांक २३, २४ व २६ जुलै रोजी येलो अर्लट तर दिनांक २५ जुलै रोजी ऑरेंज अर्लट दिलेला असुन या कालावधीमध्ये काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवलेली आहे.

या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. विज गर्जना होत असताना शक्यतो घरातच राहणे आवश्यक आहे. अशा कालावधीमध्ये मोबाईल फोन सोबत बाळगू नये. विज गर्जना सुरू असताना घरातील इलेक्ट्रिकल उपकरणे बंद ठेवावी. पाऊस व विज गर्जना होत असताना चुकूनही झाडाच्या खाली उभे राहू नये व शेतात काम करत असताना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप खांडे यांनी केले आहे.

नागरीकांनी जल पर्यटन स्थळी अती उत्साही होवून जीव धोक्यात घालणारी कुठलीही कृती करू नये. शक्यातो पाण्यामध्ये उतरण्याचे धाडस करू नये. आपण कितीही चांगले जलतरणपट्ट असले तरी अशा ठिकाणी पोहण्याचे टाळावे. नदी, नाले, दुथळी वाहत असतात तेव्हा पाणी पुलावरून किंवा रस्त्यावरून वाहत असते अशा वेळी चुकूनही तो पुल किंवा रस्ता चालत किंवा गाडी मधुन ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. आवश्यक खबरदारी घेवून स्वतःची त्याच प्रमाणे आपल्या कुटूंबियांची व मित्र परिवाराची अशा ठिकाणी आवश्यक काळजी घ्यावी व प्रशासनकडून निर्गमित होत असलेल्या सुचनांचे पालन करून सहकार्य करावे. जिल्ह्यातील समस्त नागरिकांना व शेतकऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी शासनाच्या सर्व सूचनांचे पालन करावे व स्वसंरक्षणासाठी सतर्क राहावे.

अधिक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर दूरध्वनी क्र. ०७१२-२५६२६६८ येथे संपर्क साधावा.

रामकृष्ण वाघ महाविद्यालयात संत नामदेव महाराज समाधी दिन भक्ती, संस्कृती आणि चिंतनाचा संगम

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित,रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथील मराठी विभागाच्या माध्यमातून संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा दिन याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

शैक्षणिक वातावरणात अध्यात्मिकतेचा संगम साधत, संत नामदेव महाराजांच्या विचारांवर आधारित माहिती दिली.याप्रसंगी मराठी विभागाच्या प्राध्यापिका सायली लाखे पिदळी आणि प्राध्यापिका दीप्ती धकीते यांनीही विठ्ठल भक्तीतून सामाजिक समरसतेचा मार्ग विद्यार्थ्यांच्या मनातून रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यांचा जीवनक्रम, विचारशैली आणि अभंग साहित्य महाविद्यालयाच्या दालनात मंत्रमुग्ध करणारे ठरले. सुपरिचित कवी इंद्रजित भालेराव यांच्या दूरचित्रवाणी द्वारे विद्यार्थ्यांना संत नामदेव यांच्या कार्याविषयीची सखोल माहिती देण्यात आली. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक माननीय डॉ. मारोती वाघ आणि संचालिका सौ. लता वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने विविध लोकोपयोगी उपक्रम संपन्न
मुख्यमंत्र्यांच्या जन्मदिनी आर्वी विधानसभेत भाजपाने केले अनेक जन हितार्थ कार्य

वर्धा ■ प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने आमदार सुमित वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली आर्वी येथील माहेश्वरी भवन येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या आयोजित शिबीरात ५६ आर्वी ग्रामीण व ५५ आर्वी शहर मधुन असे एकंदरीत १११ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच ग्रामपंचायत पिंपळा पुनर्वसन येथे आमदार सुमित वानखेडे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन राजेंद्र ठाकरे अध्यक्ष भाजपा ग्रामीण व राजकुमार मनोरे यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून निसर्ग जपला पाहिजे म्हणून मुख्यमंत्रींच्या जन्मदिन वृक्षारोपण करण्यात आले.

दिनांक २२ जुलैला महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस असतो. जन्मदिनाच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर शुभेच्छा देण्यासाठी उत्सुक असतात. आपल्या जन्मदिनी पैशांचा अपव्यय टाळून लोकोपयोगी असे वैद्यकीय व जनहितार्थ उपक्रम राबवण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवाहन केले होते. मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला आर्वी विधानसभा क्षेत्राचे विद्यमान आमदार सुमित वानखेडे यांनी देखील दाद देत मतदारसंघात अनेक ठिकाणी रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित केले. त्यामुळे जन्मदिनाच्या निमित्ताने होणारा पैश्याचा अपव्यय न होता जनहितार्थ विविध उपक्रम राबवून अनेकांना त्यातून लाभ होईल. जनसेवाचा ध्यास घेतलेले आमदार सुमित वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष आर्वी तालुका व आर्वी शहर यांनी जन उपयोगी पडेल असेच उपक्रम राबवले.

आर्वी येथील भाजपा व युवा मोर्चा व्दारा आयोजित रक्तदान शिबीराचे संयोजक राजेंद्र ठाकरे, जितेंद्र ठाकरे, आशिष टिकले होते. या रक्तदान शिबीराला आमदार सुमित वानखेडे यांनी आवर्जून उपस्थिती दर्शवत उपस्थितांना प्रोत्साहित केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी राजू ठाकरे, राहुल गोडबोले, प्रशांत वानखेडे, प्रशांत सव्वालाखे, संदीप काळे, विजय वाजपेयी, प्रशांत ठाकूर, अजय कटकमवार, जितेंद्र ठाकरे, आशिष टिकले, राजू पावडे, अशोक निकम, अश्विन शेंडे, धर्मेंद्र राऊत, राजेश हिवसे, बाळा सोनटक्के, पप्पू जोशी, मंगेश चांदूरकर, मनोज कसर, उषा सोनटक्के, सारिका लोखंडे, शुभांगी घाटे, शुभांगी पुरोहित, जया चौबे, कुणाल कोल्हे, सागर ठाकरे आदींनी प्रयत्न केले.

कैलासराव राऊत, अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) यांचा सत्कार



नागपूर ■ दिलीप येवले

नागपुर : गोवारी समाजाचे कैलास राऊत अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) गोवारी समाज अंमलबजावणी व सनियंत्रण समिती इतर मागास बहुजन कल्याण विभाग मंत्रालय मुंबई -३२

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय आय.टी.आय. समोर श्रद्धानंद पेठ येथील आदिवासी गोवारी समाज संघटनेद्वारा सोमवारी २१ जुलै रोजी दुपारी ४ वाजता दुसरा माळा येथे आदिवासी गोवारी समाज संघटन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष श्री.कैलाशजी राऊत यांची नुकतीच महाराष्ट्र शासनातर्फे गोवारी समाजाच्या विकासासाठी विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांची व इतर मागास बहुजन कल्याण विभाग मंत्रालय मुंबई -३२ चे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्या पदग्रहण समारंभाला माजी आदिवासी विकास राज्यमंत्री आमदार परीणयजी फुके यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच पदग्रहण समारंभात मा. ज्ञानेश वाकुडकर (प्रादेशिक उपसंचालक नागपूर विभाग नागपूर), मा. वावगे साहेब (व्यवस्थापक, महाज्योती), साळवे साहेब (प्रादेशिक उपसंचालक अमरावती विभाग अमरावती) यांच्या उपस्थितीत कार्यक्रम आयोजित केलेला होता. याप्रसंगी समाज बांधवांनी प्रचंड गर्दी केली होती. नवनियुक्त अध्यक्ष कैलास राऊत यांनी सर्व आदिवासी गोवारी समाज बांधवांचे आभार मानले.

मृद जलसंधारण विभागाने तयार करून दिलेला पुल पहिल्याच पावसात जमिनदोस्त ;जेई ससाणे यांनी केलेला प्रताप

साहूर ■ शरद वरकड



साहुर : आष्टी तालुक्यातील साहुर येथे मोठ्या प्रमाणावर नदी नाले खोलीकरण केल्याने शेतकऱ्यांच्या वहीवाटी गेल्या एक वर्षापासून बंद झाल्या आहेत त्यामुळे शेतकरी तहसील कार्यालयात गेल्या एक वर्षापासून चकरा मारत आहे परंतु याकडे संबंधित विभाग पुर्णपणे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे प्राथमिक आरोग्य केंद्रा जवळ नाल्याचे खोलीकरण केल्याने शेतकऱ्यांच्या वहीवाटी बंद झाल्या आहेत तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील कॉर्नर अरूंद केल्याने मौजा साहुर, जामगाव , रूद्रापुर तारासावंगा इत्यादी शेतकऱ्यांना जाण्यायेण्याकरीता तारेवरची कसरत करावी लागते त्यामुळेआष्टी येथील तहसीलदार मॅडम यांना अनेक वेळा निवेदन सुद्धा दीले परंतु त्यावर काहीच निर्णय घेत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले होते आमदार सुमित दादा वानखेडे यांच्याकडे सुध्दा समस्या मांडल्या त्यानंतर मात्र जेसीबी मशीन आणुन रस्ता शेतकऱ्यांना करून दिला असा रस्ता केल्याने तो पाहून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या भुवया उंचावून जात होत्या साधारण व्यक्ती सुद्धा विचार करू शकतात की जर नाल्याच्या प्रवाहात कुठल्याही प्रकारची पायली न टाकता सरळ मुरूम टाकून पाण्याचा प्रवाह बंद केला आणि रस्ता तयार केला आणि पाऊस आला तर टाकलेला मुरूम तेथे राहील का ? हा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत होता आता पहिल्याच पावसात हा तयार केलेला रस्ता वाहुन गेला त्यामुळे पुन्हा शेतकऱ्यांची वहीवाट बंद झाली व पुन्हा तहसील कार्यालयात चकरा माराव्या लागणार आहे हे त्रिकालाबाधित सत्य असुन मृद जलसंधारण विभागाचे ससाणे यांनी प्रत्यक्ष पाहणी करण्याची विनंती शेतकऱ्यांनी केली होती परंतु या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आणि शेतकऱ्यांनाच आता भोगण्यास आले तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील कॉर्नर व्यवस्थीत करण्याची मागणी शेतकरी करीत होते त्याकडे सुद्धा दुर्लक्ष केले त्यामुळे शेतकऱ्यांच्या वहीवाटीच बंद झाल्या आहे पुल वाहुन गेल्याने बाबाराव गावंडे,गोपालराव गावंडे,राजु गावंडे इत्यादी अनेक शेतकऱ्यांच्या वहीवाटीच बंद झाल्या आहेत याची लवकरात लवकर दखल घेण्याची मागणी शेतकरी करीत आहे हे विशेष.

रजक समाज सावन महोत्सव २०२५

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूरः श्री संत गाडगे बाबा रजक बहुउद्देशीय सेवा संस्था, नागपूर व अश्ट्यदसहे यांच्या संयुक्त विद्यमाने सावन महोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

श्री संत गाडगे बाबा रजक बहुउद्देशीय सेवा संस्था व अश्ट्यदसहे यांच्या महिलांनी आयोजित केलेल्या सावन महोत्सव २०२५ चा भव्य कार्यक्रम सात वचन लॉन, वर्धमान नगर, नागपूर येथे अत्यंत उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची संपूर्ण रूपरेषा अश्ट्यदसह टीमने तयार केली होती, ज्यामध्ये समाजातील महिलांनी मोठ्या संख्येने व उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरला - 'श्रे. ऍहँलाहँ् २०२५', ज्यामध्ये महिलांनी पारंपरिक वेशभूषेत रॅम्प वॉक करून आत्मविश्वास व सांस्कृतिक मूल्यांचे सुंदर दर्शन घडवले.

या स्पर्धेतील विजेत्या पुढीलप्रमाणेः पूजा जांगडे (श्रे. ऍहँलाह), विनीता चिलाटे (ईूँल्हही-ल्ज), निकिता मोखलगाय (एाम्दह्ँल्हही-ल्ज)कार्यक्रमाची शोभा वाढवणारे प्रमुख पाहुणेः मनीषा ताई पापडकर (महिला प्रमुख, शिवसेना शिंदे गट), रचना शर्मा - प्रसिद्ध डायटिशियन, फिटनेस कोच, ब्रँड ॲंबेसिडर, योगा व डान्स ट्रेनर कार्यक्रमाची खासियत म्हणजे रजक समाजातील महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला आणि नृत्य, गाणी, पारंपरिक वेशभूषा स्पर्धा व भावनिक सादरीकरण यामार्फत कार्यक्रमाला एक सांस्कृतिक रंग दिला.

या प्रसंगी रजक समाज महिला संघटनेतर्फे समाजसेवेमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला, जो महिलांच्या योगदानाचे कौतुक करणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार सुमित वानखेडे यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर संपन्न

कारंजा (घा) ■ प्रतिनिधी



कारंजा (घा): दिनांक २२ जुलै रोजी महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस असतो. दरवर्षी भाजपचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या उत्साहात शुभेच्छा देत असतात. मात्र मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या वाढदिवशी पैशांचा अपव्यय टाळून वैद्यकीय व जनहितार्थ लोकोपयोगी उपक्रम राबवण्याचे आवाहन केले आहे.

या प्रेरणेतून आर्वी विधानसभा क्षेत्राचे आमदार सुमित वानखेडे यांनी मतदारसंघात रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, वैद्यकीय तपासणी शिबिर अशा जनसेवक उपक्रमांचे आयोजन करून मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला.

त्याचाच एक भाग म्हणून, मन्नालाल मातादीन सभागृह, कारंजा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन आमदार सुमित वानखेडे यांच्या हस्ते झाले.

प्रमुख पाहुणे म्हणून विजय वाजपेयी, चक्रधर डोंगरे, रेवता धोटे, निता गजाम, सुरेश खवशी, रंजना टिपले, जगदीश डोळे, पुष्पा चरडे, रमा दुर्गे, वैशाली सरोदे, योगिता कदम, उषा चौहाण, दिलीप जसुतकर, प्रेम महिले आणि अभियानाचे संयोजक देवेंद्र नासरे यांची उपस्थिती लाभली.

'अमन ब्लड बँक, नागपूर' यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात एकूण ६० रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

शिबिराची सुरुवात श्रीमती रोशनी रोशन ढबाले यांच्या रक्तदानाने झाली, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

या प्रसंगी आमदार सुमित वानखेडे यांनी उपस्थितांना रक्तदानाचे महत्त्व पटवून दिले आणि आपल्या गुरुस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपा कारंजा तालुकाचे नेते, पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. शिबिराच्या उद्घाटन समारंभाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रेमराज कीनकर यांनी केले.

इतिहास घडवणारी युवा संसद विधान भवनात २९ व ३० जुलै रोजी



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर :नागपूर येथे एक ऐतिहासिक आणि मानाचा क्षण घडणार आहे. संसद युवा संसद २०२५ हे भव्य आयोजन साकार दृष्टी सोशल फाउंडेशन आणि कॅलिडोहोप यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २९ आणि ३० जुलै रोजी होणार आहे.

पहिल्यांदाच हा कार्यक्रम नागपूरच्या प्रतिष्ठित विधान भवनातील खालच्या सभागृहात पार पडणार असून ही एक ऐतिहासिक आणि मान्यवर युवा व्यासपीठ ठरणार आहे जिथे खरीखुरी विधीमंडळाची चर्चा होते. तिथे आता तरुणांची मते ऐकली जाणार आहेत. या कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रभरातून २०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार असल्याची माहिती पत्रकारांना पत्र परिषदेमध्ये देण्यात आली. संविधानात्मक दृष्टिकोनातून विचारमंथन, धोरणनिर्मिती, आणि लोकशाही संवादाच्या माध्यमातून ते सामाजिक प्रश्नांवर चर्चा करतील.

या वर्षीचा प्रमुख अजेंडाः 'ईंत्मे दॅ दॅप्ज्ँू १९९१' अभ्यासपूर्ण चर्चा करण्याची संधी मिळणार आहे. या विषयावर तरुणांना संवेदनशील सामाजिक आणि कायदेशीर मुद्द्यांची या आयोजना मागील मुख्य नेतृत्वः देवयानी रमेश चोपडे संचालिका, साकार दृष्टी सोशल फाउंडेशन, विश्वजीत रमेश चोपडे अध्यक्ष, संसद युवा संसद रेहान अली महासचिव, आणि आर्यन कोरडे उपाध्यक्ष यांची उपस्थिती राहतील. आणि हे आयोजन केवळ एक सादृश्य (सिम्युलेशन) नाही, तर हे एक चळवळ आहे. राजकीय दृष्ट्या जागरूक, सामाजिक दृष्ट्या जबाबदार आणि संविधान निष्ठ नागरिक घडवण्यासाठी या कार्यक्रमाची सविस्तर माहिती देण्यात येणार आहेत. यावेळी मान्यवरांची आणि तरुणांची उपस्थिती राहतील असे विश्वजीत चोपडे यांनी पत्र परिषदेत सांगितले.

गडचिरोलीला राज्यातील पहिल्या क्रमांकाचा जिल्हा बनविणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

गडचिरोलीची 'स्टील हब'च्या स्वप्नपूर्तीकडे वाटचाल
नैसर्गिक संपत्तीचा विनाश न करता विकास साधण्यास प्राधान्यक्रम
गडचिरोलीत लॉयड्स मेटल्सच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन

वृत्तसंस्था ■ गडचिरोली



गडचिरोली : गडचिरोलीची 'स्टील हब'च्या दिशेने वाटचाल होत असून सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात लोह उद्योग प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे. त्यातून त्यांच्या जीवनमानात बदल घडून गडचिरोलीत परिवर्तन घडत आहे. जल, जंगल, जमीन या गडचिरोलीच्या नैसर्गिक संपत्तीचा विनाश न करता विकास साधण्यास प्राधान्यक्रम असणार आहे. पुढील काही वर्षात नागरिकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होऊन गडचिरोली राज्यातील पहिल्या क्रमांकाचा जिल्हा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गडचिरोली जिल्ह्यातील कोनसरी येथे लॉयड्स मेटल्स ?ण्ड एनर्जी लिमिटेडच्या (एलएमईएल) विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले. यात हेडरी येथील ५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या आयर्न ओर ग्राइंडिंग प्लांट, हेडरी ते कोनसरी दरम्यानची ८५ किलोमीटर लांबीची आणि १० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेची स्लरी पाइपलाइन, आणि कोनसरी येथील ४ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या पेलेट प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. याव्यतिरिक्त, कोनसरी येथे ४.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा एकात्मिक स्टील प्रकल्प, १०० खाटांचे रुग्णालय, सीबीएसई शाळा आणि सोमनपल्ली येथील लॉयड्सच्या कर्मचारी वसाहत या प्रकल्पांचे भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. गडचिरोलीला 'स्टील हब ऑफ इंडिया' बनविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

राज्याचे वित्त व नियोजन राज्यमंत्री तसेच गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, पद्मश्री पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्त्या तुलसी मुंडा, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलिस जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. निलोत्पल, लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकारे, कोनसरीचे सरपंच श्रीकांत पावडे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

गडचिरोली : विकासाच्या नव्या पर्वाकडे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडचिरोलीच्या विकासावर आणि 'स्टील हब' बनविण्याच्या स्वप्नपूर्तीबाबत ते म्हणाले की, गडचिरोलीचा चेहरामोहरा बदलविण्याचे काम लॉयड्सच्या माध्यमातून होत आहे. २०१६ पासून अनेक अडचणींवर मात करून येथे लोह उत्खनन सुरू झाले आहे. गडचिरोलीत लोह उत्खननासाठी परवानगी देताना, जिल्ह्याचा वसाहतीसारखा वापर होऊ नये आणि येथेच रोजगार निर्माण होऊन स्टील प्रकल्पही सुरू व्हावा, या अटींवरच परवानगी देण्यात आली होती. आतापर्यंत १४ हजार स्थानिकांना रोजगार मिळाला आहे, ज्याचे उत्तम उदाहरण म्हणजे कंपनीत हाऊसकीपिंग ते एलएनजी ट्रॅक्स चालकांपर्यंतच्या पदांवर काम करणाऱ्या महिलांचा प्रवास असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पर्यावरणपूरक विकास आणि 'ग्रीन गडचिरोली' संकल्पना

८० किलोमीटर लांबीची स्लरी पाइपलाइन ही प्रदूषण टाळण्यास मदत करेल, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात सुमारे ५५ टक्के घट होईल. राज्यातील पहिली आणि देशातील चौथी अशी ही स्लरी पाइपलाईन असल्याचं त्यांनी नमूद केलं. भविष्यात ई-वाहनांचा वापर आणि गॅसवर चालणाऱ्या वाहनांद्वारे 'ग्रीन ट्रान्सपोर्टेशन'वर भर देऊन प्रदूषणमुक्त विकासाची ग्वाही त्यांनी दिली. पुढील दोन वर्षांत एक कोटी झाडे लावून गडचिरोलीचे वनआच्छादन वाढवण्याचे उद्दिष्ट असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

स्थानिकांना आरोग्य आणि शिक्षणाची हमी

उत्तम शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा स्थानिक स्तरावर उपलब्ध होतील. प्रत्येक नागरिकाला पाच लाखांपर्यंतचा उपचार शासन मोफत देत आहे, ज्यामुळे गडचिरोलीच्या नागरिकांना उपचारासाठी इतरत्र जाण्याची गरज भासणार नाही, असे त्यांनी सांगितले.

माओवादमुक्त गडचिरोली आणि विकास प्रक्रियेत सहभागाचे आवाहन

माओवादग्रस्त जिल्ह्याची ओळख पुसली जात असल्याचे सांगत माओवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवून मुख्य प्रवाहात येण्याचे आवाहन त्यांनी केले. गडचिरोलीचा विकास सुरू झाला असताना आदिवासींच्या जमिनी हिसकावल्या, 'मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्याच्या अफवा पसरविण्यात आल्या. अशा अफवांपासून सावध राहा, कारण त्या लोकांना विकासापासून दूर ठेवण्यासाठी पसरवल्या जातात असे त्यांनी स्पष्ट केले.

सहपालकमंत्री ?ड. आशिष जयस्वाल म्हणाले, वाढदिवसाच्या दिवशी हजारो लोक भेटण्यासाठी उत्सुक असतानाही मुख्यमंत्री गडचिरोलीत उपस्थित राहिले हे या जिल्ह्याप्रती असलेल्या त्यांच्या आपुलकीचे प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'विकसित भारत' आणि मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली 'विकसित महाराष्ट्र' संकल्पनेचा त्यांनी उल्लेख केला. विकासाच्या या प्रवाहात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांनी प्रास्ताविकात प्रकल्पातून करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची माहिती दिली. या कार्यक्रमाला माजी खासदार अशोक नेते, माजी आमदार डॉ. देवराव होळी, कृष्णा गजबे, रमेश बारसागडे, प्रशांत वाघरे आदी मान्यवर उपस्थित होते.

मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियान जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवा : पालकमंत्री अतुल सावे

मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र विशेष मोहिमेचे पालकमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन

वृत्तसंस्था ■ नांदेड



नांदेड : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून २२ जुलै ते २२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यात 'मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र' विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. हे अभियान जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवा, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. आज जिल्हा रुग्णालयात त्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे 'मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र' या विशेष मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. चंद्रशेखर आपनगिरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रोशना आरा तडवी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हनुमंत पाटील, डॉ. एच. साखरे, डॉ. गायकवाड तसेच सर्व नेत्र चिकित्सा अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

या मोहिमेदरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्याकडून प्रत्यक्ष गृह भेट व रुग्णालयात येणाऱ्या ४० वर्षाच्या वरील नागरिकांची नेत्र तपासणी करून मोतीबिंदूच्या रुग्णांचा शोध घेण्यात येत आहे. या सर्व रुग्णांची जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. समाजातील एकही व्यक्ती मोतीबिंदू मुळे अंध होणार नाही याची खबरदारी घेवून 'मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेला पूर्ण करण्याचे आवाहनही पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. याबाबत योग्य ती खबरदारी जिल्हा प्रशासन घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या अभियानासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून अतिशय सूक्ष्म नियोजन करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये आशा कार्यकर्ती, एमपीडब्लु, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालय यांच्या मार्फत मोतीबिंदूचे रुग्ण गाव, वस्ती, वाडी पातळीवरून शोधून, मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. सोबतच जन्मतःच मोतीबिंदू असणाऱ्या बालकांचे शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार आहेत. म्हणून त्यासाठी लागणारे नव-नविन तंत्रज्ञान (फॅको मशीन्स हे उच्च दर्जाची उपकरणे (सुक्ष्मदर्शक यंत्रणा), ए-स्कॅन बायोमीटर मशीन शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी नांदेड राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड मेघना कावली, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. नांदेड डॉ. संगीता देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. चंद्रशेखर आपनगिरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रोशना आरा तडवी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हनुमंत पाटील, डॉ. एच. साखरे, डॉ. गायकवाड तसेच इतर सर्व नेत्र चिकित्सा अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत कार्यरत राजर्षी छत्रपती शाहू महाराज मुलांचे शासकीय वसतिगृह, कांदिवली येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, यासाठी अर्ज करण्याचे आवाहन वसतिगृहाच्या गृहपाल यांच्या मार्फत करण्यात आले आहे.

१०० विद्यार्थ्यांची मंजूर क्षमता असलेल्या वसतीगृहात सध्या ४४ जागा रिक्त असून, त्या प्रवर्गनिहाय पुढीलप्रमाणे आहेत, अनुसूचित जाती ३७, अनुसूचित जमाती १, विमुक्त जाती भटक्या जमाती १, आर्थिकदृष्ट्या मागास १, विशेष मागास प्रवर्ग १, दिव्यांग २, अनाथ १ या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे पालक मुबंई महापालिका हद्दीत स्थानिक नाहीत अशा कनिष्ठ महाविद्यालयात व आयटीआय अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांना रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार व नियमांनुसार प्रवेश देण्यात येणार आहे.

प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास, नाश्ता व भोजन, बेडिंग साहित्य, ग्रंथालय व संगणक सुविधा (इंटरनेटसह) मनोरंजनासाठी दूरचित्रवाणी संच व क्रीडासाहित्य या सुविधा मोफत पुरविण्यात येतात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रुपये निर्वाह भत्ता तसेच शैक्षणिक साहित्य, प्रकल्प खर्च, गणवेश, शैक्षणिक सहल नियमानुसार देय रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते.

प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असून विद्यार्थ्यांना ए्ज:// ऍ्ऍ.ऍ्ऍप्.दे्ु या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरावा लागेल. ऑनलाइन भरलेला अर्ज पोर्टलवरून डाउनलोड करून प्रिंट आवश्यक कागदपत्रांसह वसतीगृहात किंवा सहाय्यक आयुक्त कार्यालयात ऑफलाइनरित्या सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज मुलांचे शासकीय वसतीगृह, ठाकूर कॉम्प्लेक्स, व्हिडीओकॉन टॉवरच्या समोर, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४००१०१ या ठिकाणी संपर्क साधावा, असे प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

देशी गोवंशाच्या संरक्षण, संवर्धनाकरिता प्रयत्न गरजेचे : क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : देशी गोवंशाच्या संरक्षण, संवर्धनासाठी राज्यशासनाच्यावतीने देशी गाय संशोधन केंद्राला ७१ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला असून आगामी काळातही याकामी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. देशी गोवंशाच्या संरक्षण, संवर्धनाकरिता सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. शिरनामे सभागृह, कृषी महाविद्यालय, पुणे येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'देशी गोवंश जतन व संवर्धन सप्ताहा'च्या समारोपप्रंसगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दराडे, कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, प्रमुख शास्त्रज्ञ सोमनाथ माने आदी कृषी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्री. भरणे म्हणाले, देशी गायी बाबत समाजात प्रेम, आत्मयिता असून ग्रामीण भागात महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे देशी गायीबाबत आज विविध ठिकाणी संशोधन होत आहेत. आगामी काळ हा कृषी क्षेत्राला अनुकूल असून कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शेती तसेच देशी गोवंशाच्या संरक्षण आणि संवर्धनाबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्याचे काम करावे. पुरस्कारामुळे आपल्या जबाबदारीत वाढ होते, त्यामुळे देशी गोवंशाच्या संरक्षण आणि संवर्धनाचे काम करण्यासोबतच त्याचे मोठ्या प्रमाणात प्रसार करण्याचे काम करावे, असेही श्री. भरणे म्हणाले.

श्री. बनसोडे म्हणाले, देशी गोवंश जतन व संवर्धन सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमातून विविध देशी गाईबाबत माहिती मिळाली. त्यामुळे आगामी काळात विविध गोशाळेला भेटी देऊन त्यांचे संरक्षण आणि संवर्धनाच्या कामकाजाविषयी माहिती घेण्यात येईल, असेही श्री. बनसोडे म्हणाले.

श्री. मुंदडा म्हणाले, महाराष्ट्र गोसेवा आयोगाला स्थापन होवून दोन वर्ष झाली असून गोमातेला राज्य मातेचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. गोवंश परिपोषणासाठी प्रतिमहिना १ हजार ५०० रुपये आणि प्रत्येक तालुक्यात एका गोशाळेला देशी गोवंश निवाऱ्याकरिता १५ ते २५ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. आज सर्वत्र देशी गोवंश जतन व संवर्धन दिन साजरा करण्यात येत आहे. गोसेवा आयोगाच्यातीने गोवंश संवर्धनाकरिता गोसंवर्धन, गोसंगोपन, गोसंरक्षण, गोमयमुल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोआधारित शेती, गोपालक, गोसाक्षरता आणि गोपर्यटन या संकल्पनेवर आधारित 'गो-टेन' उपक्रम राबविण्यात येत आहे. देशी गोवंश संगोपन, संवर्धनाकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोग कटीबद्ध आहे, नागरिकांनी यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन श्री. मुंदडा यांनी केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते देशी गोवंशाच्या संरक्षण, संवर्धनाकरिता काम करणाऱ्या संस्था, व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

वाढदिवशी मुख्यमंत्र्यांना गडचिरोली विकासाचा टिळा



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला वाढदिवस संपूर्णपणे गडचिरोली विकासासाठी समर्पित केला. तेथे विविध विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन केले. वृक्षारोपणाच्या मोहीमेचा शुभारंभही केला. दरम्यान, दिवसभरात राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना फोन करुन शुभेच्छा दिल्या.

शुभेच्छा देणाऱ्यांमध्ये राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, विविध राज्यांचे मुख्यमंत्री तसेच राज्यपाल, अनेक केंद्रीय मंत्री, ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, विधानसभा अध्यक्ष ?ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे तसेच इतरही अनेक मान्यवरांचा समावेश होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्यात ४.५ एमटीपीए स्टील प्लांटच्या पायाभरणी समारंभाला हजेरी लावली. हा विदर्भातील पहिलाच प्रकल्प असून, यातून २४,००० कोटींची गुंतवणूक होणार आहे, तर १०,००० रोजगार निर्माण होणार आहेत. हेडरी ते कोनसरी या महाराष्ट्रातील पहिल्या आणि विक्रमी वेळात पूर्ण झालेल्या स्लरी पाईपलाईनचे त्यांनी उद्घाटन केले. यामुळे कार्बन उत्सर्जनात ५५ टक्के घट होणार आहे. हेडरी येथील आयर्न ओर आणि ग्राईंडिंग युनिटचे त्यांनी उदघाटन केले. हे महाराष्ट्रातील पहिले युनिट आणि पोलाद क्षेत्रात नवे मापदंड स्थापन करणारे आहे. कोनसरी येथे पॅलेट प्लांटचे उदघाटन केले. हा महाराष्ट्रातील पहिला आणि एकाच रचनेतील भारतातील सर्वांत मोठा प्रकल्प असून शाश्वत पोलाद निर्मितीसाठी हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. कोनसरीत १०० खाटांच्या रुग्णालयाचे, आधुनिक सीबीएसई शाळेचे तसेच सोनमपल्ली येथे लॉईडसच्या टाऊनशीप त्यांनी भूमिपूजन केले. दुपारी 'हरित महाराष्ट्र-समृद्ध महाराष्ट्र' या मोहीमेतही भाग घेतला. नवीन वर्षाचा पहिला दिवस गडचिरोलीत त्यांनी जवानांसोबत साजरा केला होता, या भल्या मोठ्या विकासकामांतून एकप्रकारे गडचिरोलीच्या विकासाचा टिळा मुख्यमंत्र्यांना वाढदिवशी लागला.

मुख्यमंत्री सहायता निधीमार्फत राज्यभरात आरोग्याचेही अनेक उपक्रम हाती घेण्यात आले होते. रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबिर, आभा कार्ड वाटप, अवयव दानाचा प्रचार, कृत्रिम अवयव वाटप असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. अनेक मान्यवरांनी आणि स्वयंसेवी संस्थांनी मुख्यमंत्री सहायता निधीत सुद्धा योगदान दिले.

'ऑपरेशन सद्भावना' लोकशाही बळकट करणारा उपक्रम - राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

सिक्कीमच्या विद्यार्थ्यांचा राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्यासोबत संवाद

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : भारतीय लष्कराच्या ईस्टर्न कमांडच्या 'ऑपरेशन सद्भावना' हा उपक्रम भारताच्या लोकशाही मूल्यांना बळकट करणारा आहे. या उपक्रमात सिक्कीम मधील युवक-युवतींच्या सक्रिय सहभागामुळे देशाच्या समावेशक आणि ऐक्यपूर्ण भविष्यासाठी नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

राजभवन येथे भारतीय लष्कराच्या ईस्टर्न कमांडच्या 'ऑपरेशन सद्भावना' उपक्रमांतर्गत आयोजित नॅशनल इंटीग्रेशन टूर अंतर्गत सिक्कीम विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी भेट दिली. मेजर सृजन सिंह नेगी, मेजर आरती रावत, सिक्कीम विद्यापीठाचे १५ विद्यार्थी आणि शिक्षक यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, सिक्कीमधील विविध गावांतील विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी संवाद साधण्याचा हा विशेष योग माझ्यासाठी अत्यंत आनंददायी आहे. मेजर सृजन सिंह नेगी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले पाहिजे. लष्कर केवळ देशाच्या संरक्षणाचे कार्य करत नाही तर राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक समृद्धीसाठी देखील सातत्याने काम करत आहे. देशाच्या विविध भागांतील तरुणांना एकमेकांच्या संस्कृतीशी जोडणाऱ्या या दौऱ्यामुळे सद्भावना, सांस्कृतिक आदान-प्रदान आणि एकतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, विद्यार्थ्यांना या उपक्रमामुळे महाराष्ट्राची संस्कृती तसेच येथील भौगोलिक माहिती मिळण्यास मदत होईल. नावीन्यपूर्ण उपक्रम आणि प्रवासाचा अनुभव या विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभराची शिदोरी म्हणून उपयोगी पडेल. विद्यार्थ्यांना संबोधित करताना राज्यपालांनी विविधतेतील एकतेचा संदेश दिला आणि त्यांच्या प्रवासातील अनुभवातून प्रेरणा घेऊन, एकता व सांस्कृतिक वारशाची माहिती या विद्यार्थ्यांना होणार आहे. राज्यपालांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना भारतभूमीसाठी असलेल्या आपल्या सर्वांच्या कर्तव्य आणि जबाबदारी याबद्दल त्यांनी यावेळी सांगितले. तसेच त्यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचा अनुभव जाणून घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी राज्यपालांच्या प्रश्नांना आत्मविश्वासाने उत्तरे दिली.

मेजर सृजन सिंह नेगी यांनी यावेळी भारतीय लष्कराच्या ईस्टर्न कमांडच्या 'ऑपरेशन सद्भावना' उपक्रमांतर्गत राज्यात विविध ठिकाणी विद्यार्थ्यांनी दिलेल्या भेटीची माहिती दिली.

राजभवन मधील आदरातिथ्य पाहून विद्यार्थी गेले भारावून

सिक्कीम विद्यापीठाचे लॅक्चूम लेक्चा, सोनम लेक्चा, लाका डोमा या विद्यार्थ्यांनी राज्यपालांशी केलेल्या संवादादरम्यान 'आम्ही आयुष्यात प्रथमच विमान प्रवासाचा अनुभव घेतला आहे. मुंबई अनेकदा चित्रपटांमधून पाहिली होती. पण आज प्रत्यक्ष पाहताना ती खरोखरच भव्य आणि मनमोहक वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. उंच इमारती आणि प्रचंड लाटांचा समुद्र पाहून मन प्रसन्न झाले असल्याचे सांगितले. 'या दौऱ्यात आम्हाला राज्यपालांकडून मिळालेले प्रेम, आतिथ्य आणि आपुलकी अत्यंत भावले असून याबद्दल आम्ही आमच्या आईवडील, शिक्षक आणि मित्रांना या अनुभवाबद्दल सांगणार आहोत. सिक्कीमहून आलेल्या विद्यार्थ्यांची निवासव्यवस्था, संपूर्ण दौऱ्यात प्रत्येक सोयीसाठी विशेष लक्ष देण्यात आले. विद्यार्थ्यांनी एन.डी.ए.मधील प्रशिक्षण आणि शिस्तबद्धतेचा अनुभव घेतल्याचे सांगितले. मुंबईतील गिरगाव चौपाटी, अटल सेतू, गेट वे ऑफ इंडिया ही प्रेक्षणीय स्थळे त्यांनी पाहिली. तसेच मुंबईतील प्रसिद्ध बाजारात खरेदीचाही अनुभव घेतला. 'मुंबई विषयी जे काही ऐकले होते, ते प्रत्यक्षात अनुभवता आले. राज्यपालांशी भेट घेण्याची संधी मिळाली, ही आमच्यासाठी अत्यंत गौरवाची गोष्ट आहे,' असे विद्यार्थ्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील या दौऱ्यात खूप काही शिकता आले, राजभवन येथील भेटीचा हा अनुभव आमच्यासाठी अविस्मरणीय ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. 'येथे शिकलेल्या गोष्टी भविष्यात देशसेवेच्या मार्गावर उपयोगी पडतील,' असेही त्यांनी सांगितले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242